विजय खाडिलकर



भोंजगा

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

भोज्जा

कथासंग्रह

श्री विजय खाडिलकर

कथा नव्या युगाच्या

लेखक: विजय खाडिलकर

1403, माझगांव टॉवर्स, म्हातारपाखाडी,

माझगांव, मुंबई 400010

दूरध्वनि: 23776889, मोबाईल क्र. ९८२१२२२०४२

इ मेल vijay.s.khadilkar@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक :- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com
esahity@gmail.com
Whatsapp- 9987737237
(विनामूल्य ईपुस्तकांसाठी फ़क्त नाव गाव कळवा)
प्रकाशन : ४ ऑगस्ट २०२६

छापिल प्रत खासगी वितरणासाठी उपलब्ध
देणगी मूल्य- रु. २००/- फक्त
(१००% रक्कम लेखकाकडे छपाईचा खर्च म्हणून जाईल.)
(संपर्क- विजय खाडिलकर - ९८२१२२२०४२

©esahity Pratishthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

श्री विजय खाडिलकर

कलावंताला त्याच्या कलेहून अधिक वेगळ्या ओळखीची गरजच नसते असे म्हणतात. ई साहित्य प्रतिष्ठानचे वाचक विजय खाडिलकर यांना “खिडक्या” व “धर्म” या कथासंग्रहांचे लेखक आणि वास्तुपुरुष आणि मोर्चा या नाटकांचे नाटककार म्हणून ओळखतात. त्यांच्या पाचही ई पुस्तकांना वाचकांची पसंतीची दाद मिळाली. त्यामुळे हे सहावे पुस्तक. चवथा कथासंग्रह.

श्री विजय खाडिलकर यांच्या कथा वाचल्यावर हे जाणवते की या लेखकाने आपले लेखन आयुष्यभर जोपासले असते तर मराठीला एक विशेष लेखक मिळाला असता. पण फ़ार विषादाची गरज नाही. बहुराष्ट्रीय कंपनीतून निवृत्तीनंतर त्यांनी आपली लेखनकला जोपासली आणि अनेक कथा, कविता, कथासंग्रह व नाटक असा खजिना वाचकांसाठी उपलब्ध करून दिला. हे पुस्तक म्हणजे त्यांच्या संपूर्ण खजिन्याची एक झलक म्हणता येईल. खिडक्या, लालबत्ती, सरसरती सर. परिक्रमा: हे कथासंग्रह व वसंतचाहूल हा कवितासंग्रह, पारंब्या.. ही कोमसाप स्पर्धेत तृतिय पारितोषिक पात्र कादंबरी. या शिवाय दिवाळी अंकातून कथा व कविता येत असतात..

श्री विजय खाडिलकर हे जी ए कुलकर्णी यांचे चाहते. त्यामुळे त्यांच्या कथांतून जी एंची झलक दिसते, त्याचबरोबर त्याहून वेगळं

लिहिण्याची उबळही जाणवते. मानवी नातेसंबंधांतली असहाय्यता आणि सौंदर्य यांचा वेध हे जीएंच्या कथांचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य. ते खाडिलकरांच्या कथेतूनही ठळकपणे प्रत्ययाला येतं. कथेला नाट्यापेक्षा काव्यगत सार्वत्रिकता हेही जिएंचं वैशिष्ट्य खाडिलकरांच्या कथेतून जाणवतं.

पात्रांच्या मागची सामाजिक धार्मिक पार्श्वभूमी ठळक करताना काळ आणि परिसर यांत मात्र खाडिलकरांनी स्वतःचा वेगळा प्रांत चोखाळला आहे. विजय खाडिलकरांच्या कथांतून प्रत्ययाला येणारा धर्म हा surrealistic आहे. तो आहेही आणि नाहीही. वास्तव आहे. पण भिंती आणि भितीच्या पलिकडे जाऊन दोन काठांना जोडणारा पूल आणि भिन्न प्रकृतींना जवळ आणणारा पूल असे त्याचे स्वरूप जाणवते. सहृदयी वाचकांना भुरळ पडेल असे विजय खाडिलकरांचे कथानक आणि वाचताना रममाण व्हायला लावणारी त्यांची शैली यांचं गारूड वाचकावर खुप काळपर्यंत रहातं.

विजय खाडिलकरांचं हे ई पुस्तक तुम्हाला कसं वाटलं ते जाणून घ्यायला आवडेल. तुमचा विस्तृत अभिप्राय आल्यास आम्ही ऋणी राहू. ई साहित्य प्रतिष्ठान हे साहित्यावरच्या चर्चेचं व्यासपीठ व्हावं ही मुख्य प्रेरणा आहे. ते तुमच्या अभिप्रायांतूनच साध्य होऊ शकेल.

धन्यवाद

सुनीळ सामंत, टीम ई साहित्य

अर्पणपत्रिका:

"आयुष्य नावाच्या महाकथेला समर्पित"

कथानुक्रम

भोज्जा

पखवाज

शेवग्याच्या शेंगा

**भोज्जा **

कातळात खाचा मारून तयार केलेल्या पांदीच्या उंचसखल पायऱ्या थांबत थांबत उतरतांना तिला आठवलं, कितीतरी वर्षानी ती तिच्या साऊआज्जीच्या घरी येत होती. कारणाने तालुक्याला बाबांकडे येणं झालं तरी आज्जीला भेटणं कांही जमलं नव्हतं. ती जायच्या आधीसुद्धा...

आत्तासुद्धा ती आली होती ते तिच्या बाबानी तिला जमिनीच्या कामासाठी फोन करून बोलावलं म्हणून. सदाकाकाचा फोन होताच नि वाडीत तसे बरेच फोन झाले होते. एकटीने नि तेसुद्धा बसचा प्रवास करून यायचं जीवावर आलं होतं म्हणून मग पूर्वीला चल म्हणाली. तिला घेऊन मग कशीबशी पोहोचली. नवऱ्याला रजा घेऊन यायचं जीववर आलं होतं. परत जाताना कागदपत्रांची पूर्तता करायला तालुक्याला बाबांच्या घरी जावंच लागेल. तेव्हां ताईला भेटूच. ती तिथेच स्थिरावली होती.

गंमत म्हणून बरोबर आलेल्या पूर्वीला मात्र हे सगळं नवीन तरी मजेचं वाटत होतं.

पूर्वीच्या वयाची असतांना ती स्वत: नेहमीच यायची. तेव्हां साऊआज्जी हयात होती नि कौतुकाने बोलवायची. खूप माया करायची तिच्यावर. ती आज्जीची लाडकी होती. मॅट्रिकनंतर

शिक्षणासाठी मुंबईत पाऊल टाकलं नि ती मग मुंबईकरच झाली. अगदी आज्जीला जाण्यापूर्वी भेटावं वाटलं तरी जमलं नाही..

अंगणात पाऊल टाकलं नि तिचं समोर लक्ष गेलं. तुळशीवृंदावनाकडे. साऊआज्जी नैवेद्य झाला कि हाकारायची.

'गो ह्या, काय ते नांव तुझं..?'

तिला आत्ताही तशीच हांक ऐकू आल्याचा भास झाला. ती मग थांबून समोर पहातच राह्यली.

'का ग थांबलीस ममा? '

'मला हांक ऐकू आली साऊआज्जीची. '

दोघीही मग हंसल्या. पूर्वीला हे सगळं ऐकून माहित होतं!

ती मात्र थोडी खंतावल्यसारखी झाली. तिचं समोर लक्ष गेलं., पडवीचं छप्पर कललेलं.. भिंतींचे नि अंगणाचे पोपडे निघाले होते नि वृंदावनात तुळस कशीबशी तग धरून होती, कुणाच्यातरी स्पर्शाला आसुसल्यागत. मुळाशी ठेवलेला काळा शाळीग्रामही तसाच पूजेविना..

त्या परिसरात कुणाचा राबता नव्हता. कुणाचाही हात फिरत नव्हता हे सगळीकडे नजर टाकल्यावर लक्षात आलं. एवढयात समोरनं बाबाजी नारळाची गोण घेऊन आला. भिवाचा मुलगा नि तिची भोज्जाच्या खेळातली मैत्रीण वच्छी हिचा धाकटा भाऊ. तिने ओळखलं नाही. वाटलं असेल कोणी गडीमाणूस. तिला मग

भोज्जाच्या खेळाची नि आपसूकच शिऱ्याची आठवण आली. ती मग त्या वेडया आठवणीवर स्वत:शीच हंसली.

जीन घालून अडखळत चालणारी पूर्वी थांबली. तिला मावशीला फोन लावून डायरेक्ट इथेच पोहोचल्याचं कळवायचं होतं. कळवूनही दोघी आल्या का नाहीत ह्याची मावशी काळजी करत बसेल म्हणून. पण मुंबईपेक्षा जवळ असूनही तालुक्याची रेंज मिळत नव्हती. तिला नवल वाटलं...

पुढे चालणाऱ्या ममाला स्वत:शीच हंसताना पाहून ती म्हणाली.

'तू ना एकदम नॉस्टालजिक झालीयस. रिअली! '

'तुला नाही कळायचं ते. '

'तुझं लहानपणचं सिक्रेट? '

ती चपापली. पण गप्पच बसली. 'ही पूर्वी जरा आगाऊच आहे. ' ती मनातच म्हणाली....

दोघी अंगणात उतरल्यावर पाठीवरची नारळाची गोण पडवीच्या कोपऱ्यात ठेवून बाहेर आलेला बाबाजी तिला म्हणाला..

'बाबा खालती आगरात आहेत. येतीलच इतक्यात. तुम्ही पाय धुवून घ्या. '

इतकं शुद्ध बोलणं ऐकून ती बघतच राह्यली. मग तोच पुढे म्हणाला.

'ओळखलं नाहीत ना. मी बाबाजी.'

लहानपणी सदऱ्याच्या बाहीला शेंबूड पुसत वच्छीच्या मागनं रडत येणारा हा बाबाजी? तिला आश्चर्यच वाटलं.

अगदी शुद्ध बोलत होता. थोडा वयस्कर वाटत होता. तिच्याहून थोडासाच लहान. त्याचीही मुलंबाळं असतीलच कि....

त्याचा अवतारही बदललेला. त्याला तालुक्याला कुठल्याशा सरकारी प्रोजेक्टवर नोकरी होती. ती आईच्या दिवसांना तालुक्याच्या घरी आली होती. तेव्हां ओझरता पाह्यलेला.. बाबांबरोबर मधेच त्याच्या इथल्या घरी येऊन जायचा. भिवा अगदी थकला होता. त्यामुळे बाबाजीची बाबांनाही मदत व्हायची.

'तुम्हाला ठाऊकच असेल. डावीकडच्या द्रोणीवरनं पाय धुवून या. तंवर मी घरनं चहा घेऊन येतो.. "

तो गेला. नि खालनं आगरातनं बाबा हळूहळू येताना दिसले. थकलेले वाटले. पंचाहत्तरी उलटली होतीच. आणि आई गेल्यानंतर विरक्त झालेले बाबा खरं तर ताईमुळेच सावरले. तिने त्यांना नि त्यांच्या घराला संभाळलं..

तिला वाटलं, 'ताईच सगळं बघतेय् ते बरंय्. आपल्याला कुठलं जमायला.'....

लहानपणीं शाळेत असताना तालुक्यावरनं बाबा एकटीला पाठवायचे ते आठवलं. पण ते दिवस वेगळेच होते. आता साऊआज्जी

नव्हती नि हे घर बाबांना तिच्या नांवावर करायचं होतं. ती गेल्यापास्नं ते इथे येऊन जाऊन असत. आज्जीने ते बाबांच्या नांवे केलं होतं.

ताई डीएड होऊन नोकरीला तिथेच लागली म्हणून पुढे लग्न झाल्यावरही ती त्यांच्याच तालुक्याच्या घरी राह्यली. बदली मिळत नसल्यामुळे. मग नवराच बँकेच्या शाखेत बदली करून घेऊन तिथे आला. त्यामुळे ते घर उघडं राह्यलंच नि रिटायर्ड होऊन आल्यावर आईबाबाना सोबतच झाली.

ती मुंबईला मामाकडे जाऊन बीए झाली नि मग बीएड. मामानेच लग्नही जमवलं. आईला अगदी आभाळ हाती आल्यासारखं झालं होतं. दोन्ही मुली सुस्थळी पडल्या नि मार्गाला लागल्या म्हणून...

दोघी पाय धुवून येईपर्यंत बाबा पडवीतल्या झोपाळ्यावर येऊन बसले. घरात येऊन दोघींनी बाबांना नमस्कार केला. बाबांनी पूर्वीच्या डोक्यावरनं हात फिरवीत चौकशी केली.

'कॉलेजात जात असशील ना? ' मग तिच्याकडे वळून म्हणाले.

'हिला घेऊन आलीच आहेस तर दोन दिवस राहूया. आनंदरावही आले असते तर बरं झालं असतं. तायडीला फोन करून ठेव. रजा असेल ना थोडीशी.'

'एका आठवडयाचीच आहे. पण कळवीन ह्यांना लागलं तर. '

'तालुक्याचं काम तसं सोपं नाहिय्यै. आधी इथे तलाठयाला भेटायला हंवं. तुला अजून एखादी चक्कर मारावी लागेलच पण तिकडे

आपल्या घरी. इथे आनंदरावांना रजा मिळाली कि येत जा अधनंमधनं. वहिवाट रहायला हवी. बाबाजी नोकरी संभाळून येत असतो सुटीच्या दिवसात. म्हातारा भिवा अलिकडे थकलाय नि आजारी असतो. '

'बरं. पण मग जेवणाचं काय करायचं आता. आम्ही ताईकडे न जाता तडक इथेच आलो. भात टाकू का स्टोव्ह असेल तर? '

'स्टोव्ह आहे पण आता उशीर किती झालाय्. संध्याकाळीच कर आता. भिवाची बायको दशम्या नि दूध पाठवते. तेवढं पुरेल.. '

'तसं स्टॅन्डावर खाल्लंय् थोडं नि पूर्वीला भात नकोच असतो.'

दोघांच्या तोंडाकडे आळीपाळीने पहात असलेली पूर्वी मग पहिल्यांदाच बोलली. '

'हो ग ममा. मी खाईन दशमी का काय ते.. '

'अगं म्हंजे तांदूळाची भाकरीच.. '

एवढयात बाबाजी चहा नि कसलासा पाला घेऊन आला.

'ताईने दिलीय् शेवग्याची भाजी. नि ह्या दशम्या. '

'बरंच झालं. अंघोळ उरकून मी भाजीच करते पटकन्.करू ना बाबा?'

'करीनास थोडी.पण कंटाळा आला नसला तर.. '

''ताई म्हणत होतीच भाजी निवडून देते म्हणून.. '

'म्हंजे ती आलीय् इथे? मला भेटली कशी नाही अजून?'

'भेटेल संध्याकाळी.. इथेच असते ना.. ' बाबा उगाच तुटकपणाने म्हणाले असं वाटलं. त्या दोघांकडे बघत मग ती आत गेली..

.....

दुपारचा आराम झाल्यावर पुन्हा स्टोव्हवर चहा करायचा कंटाळा आला होता. पण बाबांसाठी करावाच लागला. चुलीवरच्या खिडकीतनं कलत्या उन्हाची तिरिप येत होती. मघापेक्षा आता तिचं स्वयंपाकघराकडे लक्ष गेलं.

बाबांनी फरशा लावून घेतल्या तरी आज्जीची ताकमेढ तशीच ठेवलेली दिसली. ताकाचा रांजणही उपडा घातलेला. भिंतीतल्या लाकडी फडताळातल्या वस्तूही तशाच. तिची आवडती कोकमाची लाखलोटी बरणीसुद्धा. बाजूला उपडया ठेवलेल्या ताम्हनपंचपात्राकडे लक्ष गेलं. आज्जी झोपून उठल्यावर चुलीवर चहा करायची नि पंचपात्रभर चहा पितळी ताम्हनात ओतून तोंडाने भुर्रभुर्र आवाज करत प्यायची. चिनी मातीच्या कपबशा नव्हत्याच. आज्जी त्यांना खापरं म्हणायची नि फुटतात म्हणून ती फारशी नसायचीच. गंमत म्हणजे विरजणांना मातीच्या माल्टया चालत. आठवडी बाजारातनं आणलेल्या. चुलीशेजारच्या वैलावर दुध तापवायलासुद्धा मातीचंच भांडं. आणि कढीला उभी दगडी. कल्हई नको म्हणून. ते दिवसच तसे होते.

भिवाला मात्र चहा खापरातनंच म्हणजे कोणीतरी आणून टाकलेल्या कानफुटक्या कपातनं द्यायची. तोच कप काढयासाठीही.

ताक मात्र करवंटीतनं द्यायची. इतराना चहासाठी कल्हईचे पितळी कप. आठवून तिला मजा वाटली. आता मात्र येताजाता कपबशा आणून ठेवायल्या हव्यात.....

बाबा उठून पडवीतल्या झोपाळ्यावर जाऊन बसले तशी तिने त्याना बाहेरच चहा आणून दिला नि आपला पितळी कप घेउन ओटीच्या पायरीवर येऊन बसली.. बाबांशी बोलत. पण तिचं सगळं लक्ष बाहेर अंगणाकडे होतं. वच्छी केव्हांही येईल

.....

'गो.. ह्या... आपलं.. काय म्हणू आता तुला?'

खळयात वृंदावनाजवळ उभी राहून आज्जीने हांक मारली. तिला त्या मुलीचं नांव घेऊन हांक मारणं खरं तर जमायचं नाही. पण तिने ओच दिली नाही म्हणून मग तिला आवाज दिला..

'गो, बाळा.... अगो अगो बागेश्री ऽऽऽ '

तेव्हां कुठे ती आपल्या तंद्रीतनं जागी होऊन हंसत आज्जीच्या समोर आली. आळीच्या खालच्या अंगाला कुणाच्यातरी खळयात खेळणारी भाग्यश्री हातातले सागरगोटे टाकून आली.

सुटीत गांवाला आलं कि खेळायला कांहीच नसल्यामुळे आज्जी तिला सागरगोटे नाही तर बिट्टया द्यायच. केव्हांतरी मग सदाकाकाकडे नुकताच घेतलेला रेडिओ ऐकायला जायची.

तिला हांक ऐकू आलेली तरी तिने मुद्दामच दुर्लक्ष केलं असावं.

कारण तिला आज्जीची ती विशिष्ट सुरातली 'बागेश्री ऽऽऽ.. ' अशी हांक ऐकायला मजा वाटायची. आज्जीला भाग्यश्री हा शब्दच उच्चारता यायचा नाही.

म्हणूनच ती आधी नुसतीच 'गो ऽऽ ऽऽ.. ' अशीच लांबलचक हांका मारायची. आतासुद्धा तुळशीला पाणी घालून झाल्यावर नैवेद्याचा गुळाचा खडा तिच्या हातावर ठेवायसाठी आज्जी तिला बोलवत होती. ती मग तशीच पळत स्वयंपाकघरात जाऊन कोकम घेऊन आली. आज्जीने बोटाच्या चिमटीत गूळ घेऊन तुळशीच्या बुंध्याशी टाकला नि वाटी तिच्या हातात दिली.

तिने मग कोकमात गूळ ठेवून आंबटगोड गुळाचा खडा चघळत जीभ टाळयाला लावून 'टक् ' असा आवाज करत मिटक्या मारल्या. तिला मजा वाटली.

'लहान का आहेस मिटक्या मारायला? '

मग तुळशीकडे बोट करून तिने आज्जीला विचारलं.

'तू तिथे का चिमूटभर गूळ टाकलास? '

'त्यातल्या बाळकृष्णासाठी.'

'तो कुठाय पण? डोंगळेच तर खातील. '

'अग तो फक्त वासाचा भुकेला. नि त्या डोंगळयांनाही त्यानेच पाठवलन् ना. '

ऐकून तिला गम्मत वाटली!

मधेच आठवण झाल्यासारखी मग आज्जीने खळयाच्या पेळेवर उभं राहून वर गोठयामागच्या डगरीवर गुढीसाठी चिव्याची काठी तोडणाऱ्या भिवाला हाक मारली.

'रे, ह्या ऽऽ काय तो स्स् स्स्.. अरे, काठी बघून काढ रे बाबा. कोवळी नको काढूस. मला लागणारेत पुढच्या पावसाळयाआधी शाकारणीसाठी. येशील ना रे नळे परतायला? '

'तां मगे बघूया. पण त्या चेडवासारक्याच माकाओ 'रे ऽऽ ' म्हणान् काय हाक देतस? नांव नाय हा माका? तेका गो नि माका रे. थंय नारूभटाचा चेडू ती बाजाची पेटी घेवन सारक्या सा रे गा नि काय काय आवाज काडीत बसता तसा वाटतां.. नांवा इसारतंस कि काय?'

विसरते म्हणून नव्हे तर ती तिची संवयच होती.

'नाय रे बाबा. पण ह्या शहरातल्या पोरांची नांवं काय अजबच एकेक. काय तं म्हणे बागेश्री. '

'बघ आज्जी, अजूनसुद्धा तुझ्या लक्षात नाय्यै माझं नांव. अगं भाग्यश्री म्हण. ' कोकमातला गुळाचा खडा चघळत मग ती भाग्यश्रीच हंसत म्हणाली. ती परिक्षा संपल्यावर लगेच आलेली. अजून रिझल्ट दूर होता. पुढे मे महिन्यात ताईचं लग्न. मग यायला मिळायचं नाही म्हणून.

पाडवा तोंडावर आलेला. तिला आजीच्या उंच गुढीची मजा पहायची होती. म्हणून सदाकाकाच्या दामूबरोबर बाबांनी लावून दिली. ती यायच्या आधीच बातमी वाडीभर पसरलेली. काकाच्या घरीच

फोनवर कळलेली...

तेव्हांपासूनच आज्जीची लगबग सुरू झालेली. भिवाला माहित होतं ते.त्याला आज्जीच्या त्या ढीगभर सूचनांची संवयच झालेली होती.

कधी म्हणे 'गायरीवरच्या फणसाला कुडून ठेव रे बाबा. वांडरं वाट लावतील. '

'अगे कुयऱ्या अजून वाढू तरी देस. '

'रे, बरका फणस तो. पटकन् पिकेल. नामदेवाची पोर आलीय् ना. सांदणं करीन म्हणत्ये. '

'हप्ताभर तरी जावंदेत. मगे बगूया. '

'रे झिला, मग अडसरं तरी काढून दे बाबा.ती पोर परिक्षा झाल्याबरोब्बर आल्येय्. '

' तो नामदेव का काय म्हनतंस तो आनि कोन गे?'

'रे, आक्काचा थोरला नाय का. मुंबैस असतो ब्यांकेत? त्याची पोर.'

'आज्जी, अगं ब्यांकेत नाय काय. पोष्टात.'

'तेच गो ते. आक्का गुदस्ता गेली तरी नामदेवान् जाणंयेणं ठेवलंनाहे अजून. त्याचंही हेच आज्जोळ ना.'

'तां कसा काय? तू तेची मावशी ना?'

'रे.पण मी बापसाच्याच घरात रहातेय ना मागे आल्यापास्नं..

अक्काचंही हेच माहेर. मला आहे कोण दुसरं मागेपुढे? '

अशी मग त्या 'बागेश्रीच्या' स्वागताची तयारी झालेली. आठवडाभर आधीच.

'पाडव्याच्या आगेमागे धरून चार दिवस मिळताहेत तर राहील. रहाशील ना गो? सुटीत अभ्यासाचं फार ओझं नाय्यै तोवर जमेल. वैशाखात थोरलीचं लग्न जमलं तर मग यायला गांवायचं नाय. '

ती अर्धवट तिला नि अर्धवट स्वत:शीच पुटपटली.

इतक्यात भिवाची पोर वच्छा परकराचा काचा मारून भाग्यश्रीच्या पुढयात. तिला बघून भिवा करवादला.

'शिरा इली तुज्यार. तुजा आनि हंय काय हा गो. घराकडेन् कामा नाय हंत?'

'रे, येय्ना बापडी. तेवढीच जाग रहात्ये घरात. ही पोर सुटीत आल्ये म्हणून. नायतर मी एकटीच ना घरात. '

'तू आनि तेचे लाड करा नुको हां. वर्सा दोन वर्सान् लग्नं करूक होया तेचा.'

'लाड कसले मेल्या. गुळाचा खडा नायतर चार भाजलेल्या आठळा ठेवत्ये हातावर. नि तिचं लग्न कसलं करातोय्स एवढयात. ह्मा बागेश्रीएवढीच तर दिसत्ये.'

'गे माजे आवशी, शेरात चलात सगळा. हंय गांवात कसा चलात? नि तां चेडूओ काय न्हान नाय दिसता.आत्ता त्या चेडवाक् न्हान नाय

हस म्हणा होतंस ना.मगे?

दोघी आलटून पालटून भिवाकडे नि आज्जीकडे पहायला लागल्या नि हंसत सुटल्या.

'भिवाकाका मी अजून शाळेत जातेय्. दोन् वर्षान् मेट्रिक.'

'म्हंजे भोज्जाला शिवून येणार. होय ना गो?' आज्जीला फक्त तेवढंच माहित होतं. म्हंजे पास झालं तर मांडवाखालनं गेलं नि नापास झालं तरी भोज्जाला शिवून आलं एवढंच.

'म्याट्रिक म्हंजे भोज्जाला शिवून यायचं नि मग लगेच लग्नाचं बघायचं.'

दोन वर्षांमागे शाळा सोडलेली वच्छा मग दोघींकडे पहायला लागली. बावरल्यासारखी.

तिला वाटलं पाटावर कपडे धुवायला लागलं कि लग्नं करून देतात. तेच भोज्जाला शिवणं. म्हणजे हिलाही आता आज्जी पाटावर पाठवणार तर.

'मगे मोठी झालंस का नाय्. तांच सांगा हुतंय मिया आज्जेक. वर्सादोन वर्सान् उजऊक होयां. '

'रे आधी तिच्या थोरल्या बहिणीचं व्हायचंय् बाबा.ती रत्नांग्रिस कालेजात जातेय् ना. रोज बशीतनं तालुक्यासनं जातेय.. मास्तरीण व्हायल.'

वच्छा मग भाग्यश्रीचा हात धरून म्हणाली. 'चल गो आपून

भोज्जाक् शिवून येव्या. '

तिला म्हणायचं होतं पांदीतनं धावत पाटावर जाऊन येऊया.

अजून जेवायला वेळ होता. म्हणून भाग्यश्रीनेही आज्जीला विचारलं.

'आज्जी ग, जाऊ मी भोज्जा खेळायला?' तिला वाटलं वच्छि म्हणतेय् तसं कुठे ते भोज्जाला धावत जाऊन शिवायचं.

वच्छिच्या डोक्यातला भोज्जा तिला कळणं शक्यच नव्हतं. इथली प्रथा तिला कुठली माहित असायला. तिलाही नहाण आलं होतं तरी. वाटलं असेल कांही तरी शिवाशिवीचा खेळ.

आज्जीला वाटलं ही सागरगोटे तरी किती वेळ खेळणार. जाऊदे कुठे ते खेळायला.

'पाटावर कसला भोज्जा खेळणाराहात.. कुठे पडूझडू नका म्हंजे झालं. '

'चल बेगीन्. जांवया पाटावर. कपडे घेतंस् ना? ' ती 'तसलं' समजली नि भाग्यश्रीला कांही ते कळेना.

'चल जावूया.' म्हणून ती निघाली|

'गो, तुजा डोस्क्या फिरला कि काय. तेका आनि पाटावर कशाक नेतंस. ' भिवा करवादला. त्याला माहित होतं कि पाटाच्या वरच्या अंगाला करवंदीच्या जाळीत जाणार ह्या दोघी.

'जावंदेत रे. '

'गे, पान लागला मगे माका धावूचा पडतला. ह्या टायमाक किरडू निगता थंयसर.'

'जाळीत जावू नका गो. वच्छा संभाळून न्हेस् गो तिला. '

त्या दोघी वळताहेत तो गोठयामागच्या डगरीवरनं अंगणाच्या पेळेवर उडी मारून शिऱ्या दारात हजर.

'काय रे हिगडे कुठे धडपडलास वरचा पांदीचा रस्ता सोडून'

'गे एस्टीतनं उतरलो मागे बाबल्याच्या घराजवल. तोही आलाय ना. '

बाबल्या दत्तू घाडयाचा पोर रत्नांगिरीला पोस्टात रनर होता. तालुक्यापर्यंत यायला लागायचंच. मग मधेच घरीं यायचा.'

'म्हंजे रत्नांग्रिहून आलास कि काय आत्ता. ह्मावेळी कुठची बस बाबा.'

'लवकरचीच घेतली सकाळी सातची. अप्पा म्हणाले घर झाडून ये. नव्या वर्षाच्या आधी. इथे कुठे गुढी लावायच्ये? उगाच कायतरी सांगत बसतात. मग निघालो तसाच.'

'तसा म्हंजे? '

'अंघोळ न करताच.'

'मेल्यानो. तू नि तुझा बापूस दोघंही असे कसे रे?'

'आता खाली बावीवर जाईन. नाहीतर वर पाटावर. '

'मेल्या जेवायचा असशील ना? '

'नाय. वाटेत खाल्लाय मी. पण भात जेवीन. '

'तो आहेच. पिठी करत्ये थोडकीशी. खाशील ना?'

'हो. पण एवढया लांब कुठे येऊ परत. भिवा घेऊन येईल. पत्रावळ पण पाठव गे. घरात नाय्यै बहुतेक. रे भिवा उद्या येशील ना घर झाडायला?'

भिवा त्यांचीही बाग बघायचा. त्याला हो म्हणावंच लागलं.

शिऱ्या आज्जीच्या माहेरच्या भाऊबंदांपैकीच. जगूचा मुलगा. अलिकडेच रत्नांगिरीला कॉलेजात जायला लागला होता. त्याच्यासाठी बाप रत्नांगिरीला बि-हाड करून राह्यला होता. नोकरीलाही बरं पडायचं. खाडीकडेच्या खालच्या आळीतलं इथलं घर बंद करून राह्यले बापलेक तिकडेच. आईविना पोर वाढवायचं होतं. आज्जीला जग्याची दया यायची नि कौतुकही वाटायचं.

हा पोर बरा होता. गोरागोमटा नि वाढत्या अंगाचा. पण लेंगासदरा घालायचा नि टोपीही. शाळेच्या संवयीप्रमाणे अजूनही. शेंडी नव्हती एवढंच.

आज्जीच्या मनात येऊन गेलं कि नामदेवाची थोरली ह्यालाच सांगून गेला असता तर पोर जवळपासच राह्यली असती|. पण वयात अंतर नव्हतं फार. ते बरीक खटकलं होतं.

आज्जीचं बोलणं होईतो दोघी वर धरणात गेल्यासुद्धा. धरण म्हणजे वर कातळातनं पाट वहात यायचा त्याच्याखाली एक चि-यांचा

मोठा हौद बांधलेला. रतनबाव म्हणत त्याला. त्यात साठलेलं पाणी पोपळीच्या पन्हळीतनं खाली आणून पाटात सोडलेलं. पाळीपाळीने एकेकजण पाणी सोडायचे. दोन दिवसानी पाळी आली कि आपापल्या माडापोफळींचं शिपणं करून घ्यायचे. रहाटावर बसायला नको म्हणून पाटाची सोय केलेली. वरच्या आळीतल्या सगळया भाऊबंदांची वहिवाट म्हणून.

खालच्यांना उरलं तरच पाणी मिळायचं. बिचारे वैतागायचे नि आपापल्या लाटेवरनं शिपणं करायचे.....

ह्या दोघी ज्या पांदीतनं धावत सुटल्या त्या थेट धरणाच्या वरच्या अंगाच्या डगरीवर करवंदीच्या जाळीत शिरल्या.

'हिते काय करणार गो आपण आता.. '

'मेल्या करवंदा बग तरी किती. नि करंजाच्या बियापन न्हेतंय् मी घराकडेन. बाबा मगे करवादत नाय. आठवडी बाजारातसून दिव्यासाटना तेल करून हानता घाणीवरसून. '

परकराला काचा मारून त्यात मग तिने करंजाच्या बिया गोळा केल्या नि करवंदं खाताखाता भाग्यश्रीच्या हातात दिली. मधेच मिळालेल्या काजूबियाही तिला दिल्या. तिथे धरणात, तेही वरच्या अंगाला जनावराच्या भीतिमुळे विशेष कोणी जायचं नाही.

'बेगीन जावया गो बाय. आज्जे करवादली. '

'पण ते भोज्जाला शिवायचं राह्मलंच कि.. '

'मेल्या माका दुसराच वाटला गो बाय. आपडीचा. तेच्या साटना तुका धुवायची कापडा घे म्हना हुतंय्.'

'म्हंजे.. '

'तां ऱ्हवांदेत आता. आपून खालच्या रतनबावीवर हात धुवून येवंया.चिकट झाले बग किती.. '

इतक्यात त्याना एक कुकारा ऐकू आला. त्याला प्रतिसाद म्हणून खालच्या बावीवरनं पण कुकारा आला. तशी वच्छी बावचळल्यासारखी बघत राह्यली. मग हळू आवाजात भाग्यश्रीला म्हणाली..

'तेकां जावंदेत. मगे आपून खालते जावंया. '

तिला कळलं कि बाबल्या नि शिऱ्या खाली अंघोळीसाठी रतनबावीत उतरलेत. तेच एकमेकांना कुकारे घालून इशारे देत होते.

त्या दोघी तिथेच थांबून मग चाहूल घेऊ लागल्या तशी खालून बोलणं ऐकू यायला लागलं. वच्छीने आवाज ओळखला. हळूच म्हणाली.. 'ते दोगजणां रतनबावीवर न्हाताय्तसा वाटता.. '

हलक्या पावलांनी दोघी डगरीवरनं खाली उतरत असतानाच त्यांची खुसपूस ऐकून खालनं आवाज ऐकू आला.

'को रे तो? वरसून काय ऐकतास. खालते येवा.. मग देकवतंय.. ' वच्छीला समजलं हा आवाज बाबल्याचा. आधीही बऱ्याचदा तो असाच भरदुपारी अंघोळीला आलेला. तिच्या घरावरनं जातायेता तिला

कायतरी इशारे करायचा. ती पण उगाच हंसायची.का ते कळलं नव्हतं पण तिला बाबल्या आवडायचा.

आताही तिला खुदकन् हंसू आलं. भाग्यश्री तिच्याकडे खुळ्यासारखी बघतंच राह्यली. मग हळूच दोघी धरणाला डावी घालून खाली उतरल्या. समोर लक्ष गेल्यावर भाग्यश्रीला अवघडल्यासारखं झालं.पण वच्छीमात्र गालात हंसत पहात राह्य़ली.

समोर दोघं उघडेबंब पुरूष हौदात डुबक्या मारत होते. शिऱ्या पाठमोरा होता तरी बाबल्या समोर बघत होता. तो उगाच हंसणाऱ्या वच्छीला कायतरी बोलणार होता. पण भाग्यश्रीला बघून गप्प झाला नि उगाच मांडया चोळत राह्यला.

भाग्यश्रीचं लक्ष गेलं तो भरदार उघडया पाठीचा शिऱ्या अंघोळ करण्यात तल्लीन झालेला. का ते कळेना पण त्याच्या त्या रूंद उघडया पाठीकडे पहात रहावंसं वाटलं. वच्छीने हलवल्यावर दोघी मग खाली उतरल्या तशी बाबल्याने शिऱ्याला हलवला. तो गर्रकन् वळला तशी त्याच्या कमरेपर्यंत उघडया दणकट शरिराकडे पहात रहावंसं वाटत होतं. त्याने पट्कन पंचा गुंडाल्यासारखं केलं. तिलाही मग आपल्या उघडया पोट-यांची लाज वाटली. तिने झट्कन् कांचा सोडला. नि दोघी पोफळीच्या पन्हळीखालनं वाकून पाटाच्या वाटेला धावल्या. त्या धडपडीत काचा सोडल्यावर भाग्यश्रीच्या ओच्यातली करवंदं नि काजूबिया खाली सांडल्या. बाबल्या नि वच्छी एकमेकांकडे बघून का हंसले ते तिला कळलं नाही. पण शिऱ्या मात्र शांतपणे रोखून पहातोय

असं वाटलं. हंसला नाही.

त्या मग खाली उतरून पांदीच्या वाटेनी धावत सुटल्या. तशी मधेच तिला थांबवून वच्छीने सांगितलं. 'घराकडेन् काय्येक बोलू नुको हां.'

'कां?'

'असाच. बाबलो असोच माज्याहारी बगान् हंसता तर बरा वाटता. तुका नाय वाटला.. '

'तो तुझ्याकडे पहात होता. '

'तां नाय गो. खुळग्याच हंस. अगो तो शिऱ्या नाय तुज्याहारी टक लाव्न बगा हुतो. मगे बरा नाय वाटला?'

'म्हंजे कसं? '

'हंय छात्येत कायतरी होता. धडधडता तसा.. '

''कायतरी वाटलं खरं. शिरशिरी आली.'

'कान तापले का नाय. मग असला काय बगूचा नाय म्हणान् आज्जे करवादतली. तिका काय सांगा नुको हां.'....

दोघी आपापल्या घरी गेल्या.. तरी भाग्यश्रीला शिऱ्याच्या त्या तसल्या उघडयाबंब दर्शनाने नि त्याच्या रोखून पहाण्याने धडधडतंच राह्यलं. सारखी त्याची आठवण येत राह्यली. संध्याकाळी खळयात आज्जीसोबत बोलतांना तो आलाच. भाताचं भगुणं परत द्यायला. कांही न बोलता पण तिच्याकडेच बघत करवंदं नि काजूबिया आजीच्या पुढयात ठेवल्या. ती लाजून आत पळाली.

'ह्या कुठनं आणल्यास मेल्या?'

'नाय गे धरणात गावल्या, त्या आणल्या. ' मग फारसं कांही न बोलता दाराआडून

डोकवणाऱ्या तिच्याकडे बघत तो निघूनच गेला. तरी आज्जीच्या अनुभवी नजरेत वेगळाच भाव दिसला. तिने आत येऊन ते सगळं भाग्यश्रीच्या हातावर ठेवलं. 'तू वरती गेलीवतीस ना भोज्जा खेळायला. तेव्हां विसरलीस कि काय?' भाग्यश्री कांहीच बोलली नाही. पण आज्जी रोखून पहातेय् असं उगाच वाटलं...

पुढे ती जी गेली ती परतलीच नाही. शिऱ्या मात्र येत राह्यला नि आज्जीकडे आडून आडून चौकशी करत राह्यला. ती मात्र पुढच्या शिक्षणासाठी मुंबईला निघून गेली. थोडे दिवस त्या गोड आठवणीनी चाळवल्यासारखं झालं खरं पण मग शहरात गेल्यावर विसरली सगळं..

आता इतक्या वर्षांनी सगळा चित्रपट डोळयांपुढे उलगडला. बाबांच्या होला हो करतांना तिच्या मनात मात्र सगळया आठवणींनी गर्दी केली नि वाटलं वच्छा भेटली तर कळेल कांहीतरी.. आणि शंभर वर्ष आयुष्य असल्यासारखी वच्छा खालच्या आगरात पाटाचं पाणी फिरवून हजर झाली. ते काम ती रोज करत असावी.

'बाबानूं. पाणी सोडलंय् हा शिपण्याचा. झाला का मगे जगूकाकांच्या पाटात सोडूया. चलात ना? आता आणि असा कोण

शिपणा करूक.. "

हे सगळं ती बाहेरनंच बोलली नि दाराशी आल्यावर पाय-यांवर बसलेल्या भाग्यश्रीला बघून एकदम हुरळूनच गेली. तिलाही खरं तर भेटायला यायचंच होतं. किती वर्ष लोटली मधे. शिपणं हे निमित्त होतं. बाबाजीने खबर दिलीच होती..

तिला बघून भाग्यश्री उठून बाहेर आली.

'बाय माजे, मुंबईकरीण इली असा ना.. नि ह्या भाएर कोण तुजा चेडू कि काय?'

भाग्यश्री नुसती हंसली. पूर्वीने एकदा पाह्यल्यासारखं केलं नि गाणी ऐकण्यात गुंग झाली.

दोघी मग अंगणाच्या पेळेवर बसल्या.

'जगूकाकांचं शिपणंही तुम्हीच करता?'

'मगे.. असा कोण थंय.. म्हातारो एखाददोन महिन्यातना येव्न जाता.. नोकरी झाल्यावर थंयच 'हवले ना रत्नांग्रिक.'

'दुसरं कोण असतं इथे? '

वच्छीला कळलं ती आडून शिऱ्याचीच चौकशी करतेय्.

'कोन असनार.. शिरीभाव लांब निघान् गेलो नोकरीच्या कारणान्. लग्नकार्य काय केल्यान् नाय तेणां.. हंय म्हातारयाक् बगूक कोण नाय.जावन् ऱ्हवलो हा म्हेवण्याकडेन्.' वच्छीने एका दमात सगळी माहिती पुरवली. पाढा वाचल्यासारखी. नि मग अलगद तिच्या

हातावर हात ठेवला. भाग्यश्री कांहीच बोलली नाही.

मधेच आत डोकावल्यासारखं केलन. बाबा आत निघून गेलेले. मग कांहीतरी बोलायचं म्हणून म्हणाली..

'तू कशी पण आलीस माहेरी? नि मुलंबाळं?'

वच्छीला कळलं हिला कांही माहिती नाहीये.

'कसला म्हाएर नि सासर घेव्न बसलंस बाए.. हंयसरच ऱ्हवतंय मी आता. म्हाताऱ्याक बगतंय.. बाबाजी थंय नोकरी साटना ऱ्हंवता ना.'

कांहीच न समजल्यासारखी भाग्यश्री तिच्या गळयातल्या काळया पोतीकडे बघत राह्यली. कांहीतरी घोळ झालाय् एवढंच लक्षात आलं तिच्या.

एकदा आत नि एकदा पूवीकडे पहात वच्छीने सुरवात केली....

'त्या बाबल्यान् माका फसवल्यान्.जवां येवचो पाटावर भेटूक बोलवूचो. पांदित तेणां माजो हात धरल्यान् तां तेच्या भैणीच्या धाकल्यान् बगल्यान् वाटता. आमचा जमला तेची तेच्या घरच्यांका आधीच कुणकुण होती.'

'मग त्यांनी तुझ्याशीच का नाय लग्नाचं ठरवलेनी?'

'आमच्यात् लग्नाचो व्हेवार होत नाय म्हणा हुतो बाबाजी. तेणां इचारल्यान् असतलां. फुडे मग घरच्यानी तेका कोलापूराक कि खंय् ती बदली करून घेव्क सांगल्यानी.'

‘मग तू गप्प का -हायलीस? त्याच्याशी बोलली नाहीस कधी? ’

‘बोलणार काय ना कदी? एकडाव गेलो तो येव्कच नाय. पावण्यांहारी -हाई हुतो. थंयच तेचा लग्नओ करून दिल्यानी. तां लई फुडे.पन तेच्या अगोदर हंय माजा कर्म फुटला.’

‘म्हंजे? ’

‘गो बाय माजे, म्हयनो येव्क नाय म्हनताना आयेन् म्हाताऱ्याक सांगल्यान् ना तेणां तळेबाजारात कि खंय कोन पावनो भेटलो तेच्या सांगण्यावरसून लांब तकडे पालगडच्या जवळ खंयतरी घर नि वाडी बगून जानत्या मानसाशी लग्न लावून दिल्यानी|. तेची पैली बायल गेली म्हनत पन तां खरा नाय ह्या माका नंतर समाजला. ती पळून गेलेली शेरात.’

‘बापरे मग तुझ्या त्या मुलाचं काय झालं? एवढं सगळं सोसूनही मग परत का आलीस?’

‘शिरा इली त्या माज्या नशीबावर ती सात म्हैन्याची बाळत झाल्यावर तेंका सौंशय. दिल्यानी धाडून माघारी. बरा तां पोर जगला नाय आनि. मगे इलंय परत नि हंयच ऱ्हवतंय्.आवूस माजी धक्कयान् गेली. बाबाजीक् सांगलंय् का काय असात ता खाएन ना देशीत ता नेसन.’

हतबुद्ध झाल्यासारखी भाग्यश्री तिच्याकडे पहातच राह्यली. कांहीच न सुचल्यासारखी. क्षणभर मनात शिऱ्याचा विचार आला नि वाटलं त्यानेही असंच कांही केलं असतं तर आपली काय गत झाली

असती. तिने तो विचार झटकून टाकला. कारण शिऱ्या अजून लग्नाचा राह्यलाय्. म्हणजे आपल्याला वाटलेलं आकर्षण तात्पुरतं असलं तरी त्याला खरंच आपण आवडत होतो?.. ..

आतून बाबांची हांक आली म्हणून तिला उठावंच लागलं. तिने सहज पूर्वीकडे पाह्यलं. ती अजून

आपल्यातच गुंग असलेली बघून हायसं वाटलं. भोवती अंधार दाटलेला बघून आत जाऊन देवघरातलं पंचपाळं घेऊन आली. आज्जीच्या वेळची संवय. कुंकू लावायसाठी पुढे केलेला तिचा हात धरून वच्छीच म्हणाली.. 'नाय गो बाय. तसला काय्यैक करा नुको. ' तिला नवल वाटलं.

'बाय माजे, लोकांच्या नजरेसाटनां पोत घालतंय ना टिकलीबी लावतंय्. पन तां काय खरा नाय्.'

'का लावतेस मग ते? '

'जेच्या नांवचा लावतंय् तो म्हातारो जितो हा ना. ज्याणा लावूचा तो मात्र निगान् गेलो. '

'म्हंजे.. '

'बाबल्या आपल्या नव्या व्हकलेक घेऊन येई होतो तो एसटीच्या अपघातात गेलो.मी हंय येवच्या अगोदरच. सगळयाचोच असो इस्कोट झालेलो.. माका कळला तेवाच्यान मिया खंय जात नाय. कोणाक कुकू

लावत नाय ना लावन् घेतओ नाय्. '

आता मात्र ऐकून भाग्यश्री सुन्न झाली. तेच बोट मग तुळशीला लावून आपल्या कपाळी लावलं. तिला कळेना कि वच्छाची किंव वाटतेय् कि आपल्या नशीबाचा आनंद. तुळशीला हात जोडतांना नकळत तिने मनात प्रार्थना केली. आपला 'आनंद' सुखरूप असो. "

ती मागे वळतेय् तो एकाएकी वच्छाने तिला मिठी मारली नि म्हणाली 'एका चुकीन काय भोग इलो हा बाय. '

तिला शांत करत भाग्यश्री म्हणाली, 'खरंच. भोगच होता तुझ्या वाटयाला.'

मिठी सोडत निघता निघता वच्छा म्हणाली,,, 'फुडचा ऐकतंस? तेची आवूस माका वरते धरणात येवन् भेटलंली. म्हणा होती, का तुजो झील ऱ्हवतो तर माजे वंशाक दिवो ऱ्हवतो. '

जड पावलांनी वच्छा खाली आगरात गेली नि भाग्यश्री सुन्न होऊन भरल्या डोळयांनी पहात राह्यली. तिचं लक्ष गेलं लेकीने कानातले बोळे काढून एक सुस्कारा सोडल्यासारखा वाटला. ती उठून आत गेली. तिकडे पहात भाग्यश्री गोंधळली. लेकीने आपला संवाद ऐकला असावासं वाटलं. वरती धरणात जाणाऱ्या पांदीकडे पहातांना तिला मग भोज्जा आठवला ज्याला ती कधीच शिवली नाही!!

**** ****

** पखवाज **

पक्षांची किलबिल, विहीरीवरच्या रहाटाचा नि दुरून येणारा पवनचक्कीचा असे एकमेकात मिसळलेले आवाज.. वासुदेवाच्या चिपळ्याच कमी होत्या. नि त्यात तांबडं फ़ुटायची वेळ..

जेमतेम माणूस ओळखता येईल इतपतच प्रकाशाची एखादी तिरीप झाडांच्या काळोख्या सांवल्यांमधून येत होती ; झरोक्यातनं आल्यागत!

अचानक देवळाच्या सभामंडपाच्या ओवरीतनं पखवाज वाजल्याचा आवाज सुरू झाला नि तो ऐकून आवारातच रहाणारे शास्त्रीबुवा म्हणजे लक्ष्मणशास्त्री नि त्यांची मुलगी वत्सला बाहेर ओटीवर आले.अजून ते काकडा घेऊन देवळात गेले नव्हते, मग पखवाज कोण वाजवतंय?

त्यांनी पाह्यलं तर पखवाज जाग्यावर नव्हता. म्हणजे हा बाबी गुरव आला कधी नि पखवाज घेऊन गेला कधी? आणि आपल्याला जाग कशी आली नाही.ह्याचं त्यांना आश्चर्य वाटलं. त्यांनी चमकून वच्छीकडे पाह्यलं. पडवीच्या रेज्यांमधून बाहेर कानोसा घेणारी वच्छी एकदम वळून कांही बोलणार तो पखवाजाचा दणदणाट एकदम बंद झाला नि हलकी गत सुरू झाली..

माजघरातच देव असल्यामुळे माच्यावर उठून बसल्यावर थोडा वेळ देवाचं नांव घेण्याचा बुवांचा परिपाठ होता. डावीकडच्या स्वयंपाक घरात वच्छीच्या आईचा, काकींचा वावर सुरू झालेला.. मधेच माजघरात येऊन त्यांनी समईची काजळी झाडून वात नीट केली तेव्हां त्यांनाही कळलं नाही. कोणालाच कसं कांही कळलं नाही? हा गुरव येऊन गेला म्हणजे पडवीच्या दाराचा अडणा लावायचा राह्यला कि काय असं वाटून वच्छी उगाच घाबरली. 'कोण असेल एवढ्या सकाळी पहाट फ़ुटायला, असं मनाशी म्हणताहेत तो काकी ओटीवर आल्या नि पडवीतल्या झोपाळ्यावर पडलेली बॅग त्यांना दिसली. रेज्यातून बाहेर डोकावणाऱ्या पाठमोऱ्या वच्छीला त्या म्हणाल्या,

.'अगो वच्छे तुला दिसलं नाय कि काय काळोखात? ही बघ बॅग.. अच्याचीच असणार.. हा कधी आला पहाटेस नि मग त्याला दार कोणी उघडलं..?'

'अगं, पण नक्की तोच कशावरून आलाय?आज काय रविवार नाये.त्याचं यायचं तर कांही ठरलं नव्हतं.'

'दुसरं येणार कोण मग?'

'शेजारचं कोणी असेल. कामतमास्तर नायतर बॅंकेतला शिपाई सीताराम.मानकर. दर आठवड्याला येतात ना.. रत्नांग्रीहून.'

'ते इथे कशाला येतील?'

'पहाटेचा काकडा मिळाला तर मिळाला. नाहीतर बाबांबरोबर चहा प्यायला.तुझा लवकर होतो ना.'

'मला वाटतंय अच्चाच असेल.'

'येईलच ना असेल तर. बॅगेसारखी बॅग.. त्याला आधी येऊ तर देस.. '

तोच तिच्या नजरेला मोठ्या दिंडीतून येणारा, कमरेत वाकून चालणारा बाबी गुरव दिसला.तोही बहुतेक आवाज ऐकूनच आला असावा. हातातली तांब्याची देवीच्या पुजेचं पाणी भरायची चकचकीत घागर दीपमाळेच्या ओट्यावर ठेवून बुवांच्या घराकडेच येतांना दिसला. नेहमीसारखाच, गाभाऱ्याची चावी न्यायला. पण पखवाजाचा आवाज ऐकून तोही चक्रावलेलाच वाटत होता.

'तुम्ही तर दिंडीतनं आत्ता आत येताय.मग पखवाज वाजवतंय कोण?' वच्छीचं कुतूहल. तिला अजूनही आई म्हणाली त्यावर विश्वास नव्हता.कारण.. ते कारण फ़क्त तिलाच माहित होतं!

'तांच म्हनतंय मिया.. काल अंग मोडावल्यान सांजच्याक मी येऊक नाय. मी शंकऱ्याक पाठ्वलंय. त्या टायमाकच तेका म्हनलंलंय का सक्कळची पाळीओ तूच वाजव; तिन्हीसांजेक मिया वाजवीन.पण आत्ता ह्या टायमाक तो काय मांगरातसून उठून येऊक नाय; ही घागर घेऊन जाऊक.. थंयच झोपलो आसतलो.. आवाज ऐकून मीच इलंय मगे.' "

'त्यालाही आवाज आला असेलच कि.'

'गे माजे आवशी, पार खाडीपोत्तर आवाज पोचलो हा. माका म्हनतीत काय लोकां? '

वच्छीचे डोळे चमकले.. तिला हेच अपेक्षित होतं बहुतेक.! आईकडे वळून ती म्हणाली.

'बघ आई, मी म्हटलं नव्हतं, दुसरंच कोणी असेल म्हणून.. '

'तू कांहीही म्हटलेलं नाहीस.. ती बॅग तशीच आहे झोपाळ्यावर.'

गोंधळलेले उघड्या अंगाचे लक्ष्मणशास्त्री अजूनच गोंधळले नि जानव्याने पाठ खाजवीत म्हणाले..

'अगो बायानो, मग वाजवतंय कोण? आणि त्याणे नेलन कधी पखवाज? '

ह्या गोंधळात चुलीत विस्तव घातल्याचं काकींच्या लक्षात आलं नि त्या आत गेल्या नि

पाठोपाठ शास्त्रीबुवा..

गोंधळलेला बाबी दीपमाळेजवळची घागर घेऊन मंडपाकडे निघाला. त्याला अजूनही पखवाजावर हळूवार बोटं चालवून घुमलेला हलकासा आवाज ऐकू येत होता.. वच्छी मात्र अजून आशा धरून होती कि शंकरच आला असेल. पण पडवीतनं पखवाज नेलन कधी नि तेही आपल्या द्रुष्टीला न पडता ह्याचं आश्चर्य करत राह्यली.एवढ्यात दिशा उजळल्या नि पडवीच्या रेज्यातून एक कवडसा झोपाळ्यावर पडला नि त्या प्रकाशात तिचं झोपाळ्यावरच्या बॅगेकडे लक्ष गेलं.. तिला दोन ए दिसले नि तिची मग खात्री झाली.

रत्नांग्रिला ख-यांकडे राहून कॉलेज करणारा अच्युत भाऊंची छोटी ब्रीफ़केस घेऊन महिन्याभरातनं एखादी चक्कर टाकायचा.भाऊ म्हणजे आत्तेचे यजमान.. नोकरीत होते. त्यांच्यावर अच्युतच्या कॉलेजशिक्षणाची जबाबदारी टाकलेली शास्त्रीबुवांनी..

तो तसा रमला होता तिथे. पण लहानपणापासून शंकरशी दोस्ती. मग यायचे ते ठरवून

एकमेकांना भेटायसाठी.. आवड तशी दोघांनाही होती; पण शंकरच्या घरातच वाजवण्याचा मान आणि संस्कार असल्यामुळे त्याला जरा जास्तच आवड होती.. दोघांची इथेच भेट व्हायची..

..

आई म्हणाली तसं अच्युत दादाच आलाय.. दोन ए म्हणजे अच्युत अभ्यंकर.' तिने स्वत:शीच कबुली दिली पण मग तिची शंकर आत्ताच दिसेल ही आशा मावळली.दादाच कोंडात जातो आताशे गुरववाड्यात त्याला भेटायला.. म्हणजे बहुतेक सिग्रेट ओढायला.. हे हल्लीच कानांवर आलं होतं..

'बाबी म्हणतोय तसा कालही त्याला संध्याकाळी बघितला नव्हता, आणि देवळाकडे तर आपण

फ़िरकलोच नाही. ती शांतुली सुरंगीचा वळेसर द्यायला आली तेव्हां मागच्या दारी गडग्यापाशीच

बोलत राह्यलो आपण नि लक्षच गेलं नाही.. आता शांतुली पूजेची फ़ुलं नि वळेसर द्यायला येईल देवळात तेव्हां कळेलच. शंकरचं राहो, पण दादाला बघून शांतुलीच इथे घिरट्या घालत रहायची. आत्ता पखवाज वाजला म्हणजे काकडाआरती झालीच असेल.पण मग कोणी केली असेल? सगळाच गोंधळ!'

तिचं स्वगत संपतंय तो काय तरी आठवल्यासारख्या काकी परत ओटीवर डोकावत तिला म्हणाल्या, 'अगो, त्या बाबीला म्हणावं अच्चाला पाठवून दे.आणि तूही ये म्हणावं घागर भरायच्या आधीच चहा प्यायला. झालाय माझा.'

'तो जाईल आता बावीवर. घागर गाभाऱ्यात ठेवायची असेल ना..'

'असा कसा जाईल अंघोळीशिवाय?'

'मग करीलच ना तिकडे.' ती झोपाळ्यावरची बॅग उघडायच्या प्रयत्नात.

'अगं बये, त्याला पारोशानेच यायला सांग हाक मारून.. मला पाठच्या गडग्याजवळच्या शेवग्याचा कोवळा पाला काढून देस म्हणावं अंघोळीच्या आधी.. झाल्या तर शेंगाही काढ चार.'

'शेंगा काढीलच.त्यालाही हव्याच असणार मिळाल्या तर.. पण तुला पाला कशाला हवाय?'

'भाजी करीन म्हणत्ये.दादा आलाय ना तुझा.. आणि भाकरी टाकीन चार.. दुभतं नायच आताशे. गाय आटल्येय.. ह्यांनाच दूध पुरत नाय तर विरजण कुठ्नं लावणार. आणि भाजी मिळतेय कुठे आठवडी बाजाराशिवाय! ह्यांना काय जायला होत नाही.तूच गेलीस तर.''

हे सगळं रामायण सांगून त्या आत जाईपर्यंत बाबी मंडपात पोहोचलासुद्धा. कारण हलकासा

येणारा आवाजही थांबला..

'वच्छे, ह्यांना चहा नेऊन देस ओटीवर.'

'आले आले, पण अण्णा मागच्या दारी असतील ना?'

इतक्यात परसातनं अण्णांचीच हाक आली..

'वच्छे, पाणी देस गो पाय धुवायला.' परसातनं आलेल्या अण्णांना पाय धुवायला पाणी दिलं कि

उघड्या अंगाने ते कानावरचं जानवं काढून पंचाने तोंड पुसत माजघरात येणार.. हा रोजचा

परिपाठ.. मग स्वत:शीच बडबडत वत्सला मागे गेली..

'सारखी दोघं हाका मारत रहातात..!'

तोवर पुन्हा काकींची हाक..

'आणि तुझंही आवर लवकर नि देवळात फ़ेरी मारून ये.गुरवाला काय हवंय पुजेच्या तयारीत ते बघून ये एकदा.. शांतुली येईल गजरे नि

फ़ुलं घेऊन. तोवर तो गेला असला म्हंजे बरं.. हे जातील जराशाने अंघोळ झाली कि.. '

'त्याला वेळ आहे ग अजून कितीतरी.. पण तो गेला म्हंजे कोण?'

'कोण नाय.त्या शांतुलीशी फ़ार घसट नको बरं का.. उगाच त्या शंकऱ्याकडे जातायेता बघत बसते.. तो बिचारा सरळ आहे म्हणून.'

'त्यात शांतुलीचा काय दोष?'

तिला उघडपणे म्हणावंसं वाटत असतं.. 'तो आहेच तसा!'

'वाढत्या वयाच्या मुलींना जपलेलं बरं.. '

तिला वाटलं हे आपल्यालाच तर नव्हे!

'आणि आता जा लवकर चहा घेऊन अंग धुवायला.'

'जातेय जराशाने.. आता दादा येतोय का बघते चहाला.. '

'बघायचं काय त्यात.. येईलच तो. रात्रीचा प्रवास झालाय. चहा हवाच.मी देते त्याला. तू जा तुझ्या कामाला.. ' कामं करतांना काकींचा पट्टा चालूच होता.

'तिला वाटलं आपण शंकरला बघायला जातोय असं आईला वाटलं कि काय.. उघडपणे मग

एवढंच म्हणाली..

'घाई किती करत्येस सगळ्याची.आत्ताशी तर उजाडतंय.'

'अगो, पण वेळेवारी व्हायला हवं ना सगळं? कसं होणारे तुझं सासरी ती अंबाबाईच जाणे!'

'झालं का तुझं सुरू!'

वच्छी मग मागच्या दारी गेली..

.. बाबी गुरवाचा भाचा शंकर कुडाळला का कुठे ते देसायांच्या केनिंग फ़ेक्टरीत सुपरवायझर म्हणून काम करायचा सीझनप्रमाणे आमरस, कोकम सरबत नि कसले कसले सीलबंद केन

कोणाची ती लेबलं लावून शहरातनं पाठवायचं काम असे.. पावसाळ्यात मात्र काम बंद. तेव्हां मग घरीच असायचा नि मामाच्या शेताकडे बघायचा.. देवळातल्या कामात मदत करायचा. एरव्ही नोकरी संभाळून शनिवारी रात्री घरी यायचा.

सीमेवरच्या गांवात दिलेली बाबीची थोरली बहिण लवकर वारली नि तेव्हांपासून लहानगा शंकर मामाकडेच होता.मामाचं बघून पखवाज वाजवायला शिकला होता.. लोकं म्हणत कि सुलग्या म्हणजे बाबीची बहिण सुलक्षणा उत्सवासाठी आलेल्या कामतेकरणीच्या झिलाबरोबर पळून गेली.. शिरोड्याला! तिला म्हणे बापाची फ़ूस होती.. म्हणजे बाबीचा बाप चंपा कामतेकरणीच्या गाण्याला वाजवायचा ना, पालखीच्या वेळी.!.बाबी बराच लहान होता; कांही बोलू शकत नव्हता.. पुढे बाप गेल्यावर त्यानेच भाच्याला आणून ठेवलान,

घरकारणीकडे दुर्लक्ष करून! शंकर तेव्हांपासून मांगरातरच झोपा उठायचा..

अच्चाचा म्हणजे अच्युतचा शाळासोबती म्हणून शंकर शाळा सुटल्यावर यायचा, तेव्हां उचलत नव्हता तरी पडवीतला पखवाज काढून देवळामागे चाफ़्याखाली नेऊन वाजवत बसायचा. कानावर चाफ़्याचं फ़ूल अडकवून खाली मान घालून तल्लीन होऊन वाजवत बसलेला शंकर परकऱ्या वत्सलेला आवडायचा.संध्याकाळच्या धूपारतीसाठी वळेसर घेऊन आलेली तिची मॅत्रिण शांतुली नि ती, दीपमाळेच्या ओट्यावर खाली पाय सोडून हलवीत बसायच्या तेव्हां वच्छी ठेका धरायची नि शांतुलीला अगदी नाचावं वाटायचं. बाबी गुरव आरतीच्या तयारीसाठी आला कि शांतुलीकडचे वळेसर नि हार गाभाऱ्याच्या पायरीवर ठेवून थेट चाफ़्याजवळच्या बावीवर पाय धुवायला जायचा नि मग नादिष्ट शंकरच्या हातून पखवाज काढून घ्यायचा कि आवाज बंद.

'मेल्या सारको बडवतंस तां वाद्या उरतरत ना तेच्या! मगे आवाजओ उतरता. ता मगे.लावूक कोणाक येताहा हंय? आरत्येच्या टायमाक अन्नानी इच्चारल्यानी तर मगे काय सांगू त्येंका?'

इकडे मग पुढे मंडपाबाहेर पाय हलवत बसलेल्या दोघी हंसत सुटायच्या.. मग पडवीच्या रेज्यांजवळ ठेवलेला पाण्याचा तांब्या तोंडाला लावायच्या.

तेव्हां कंदील लावायच्या आधीच पूर्ण व्हायला हवा म्हणून ग्रुहपाठ करत बसलेला अच्युत ओरडायचा. ' रोजरोज काय दंगा करता ग?'

शांतुलीला आवडायचं ते. रिबीनी नाही म्हणून केळीच्या सोपटाने वर बांधलेल्या वेण्या हलवत ती निघून जायची.

'अगं.. आरतीला थांब ना.. ' वच्छीचा आग्रह असायचा.कारण तिच्या आडून शंकरशी बोलता यायचं.

'नुको गे बाय.. अंदार केदो पडतलो.. थोडां दिसतां हा तंवसरच निगतंय. पांदीतसून भय

वाटता जाऊक.. ' ती सहेतुक पणे अच्चाकडे पहायची.. तिला वाटायचं हा म्हणेल कि

'मी येतो कि कंदील घेऊन.. "

तिला आवडायचा अच्चा!

आणि शंकर, श्रावणातल्या वेद्यबुवांच्या कीर्तनामधे त्यांचा तबलजी नसला तर त्यांना साथ द्यायचा.नंतर आरतीसाठीही ठेका धरायचा.

नवरात्रात घाटावरनं गोंधळी आले तरी हा उत्साहाने पुढे.. कमरेला धोतराच्या सोग्यात बांधलेला ताशा वाजवणारा असला तरी शंकरच्या पखवाजाशिवाय त्यांनाही मजा नाय वाटायची.. वच्छीला

आवडायचा तो.. उत्सवातही पालखीपुढे तोच पखवाज वाजवायचा आताशे.

आणि मानाचा विडा घेऊन जायचा..

फ़क्त.तेवढंच अजून शिल्लक राह्यलं होतं.कलावंतीणीचं गाणं भजन गेल्या पिढीतच बंद झालं.कधीकाळी शेला पांघरून नथ घातलेली चंपा कामतेकरीण किनऱ्या आवाजात आरतीसारखं कायतरी म्हणत पालखीतल्या देवीच्या मुखवट्यावर चौऱ्या ढाळायची.. वच्छीला आईने सांगितलेलं.कि अगदी वय झालं तरी आताआता पर्यंत चंपा कामतेकरीण मुलग्याला घेऊन तरी यायचीच नि मानाचं लुगडं घेऊन जायची. 'तेव्हांच तर!' असं म्हणून आई वाक्य अर्धवट का सोडायची ते मात्र कळायचं नाही.. तिच्या पुढे बाबीचा बाप म्हणे असाच पखवाज वाजवायचा नि घाटावरनं श्रद्धेपोटी येणारे दोघं जणं गोंधळी.त्याच्या साथीला.. एकजण चोंडकं नि दुसरा संबळ असं वाजवीत म्हणे.. पुढे ते बंद झालं, सुलग्या त्या विशा कामतेकरा बरोबर पळून गेल्यापास्नं.. बापाने बाबीलाच पुढे करून उत्सवातनं अंग काढून घेतलं.. पुढे गेलाच तो..

.....

''आज्याचं नि मामाचं बघूनच शिकलेल्या शंकरच्या पखवाज वाजवण्यावर सगळेच खूष असतात.. त्यांच्याही कानांना संवय झाली असावी.. तो म्हणे मृदंगही वाजवायला शिकलावता सीमेपार तिकडे

कर्नाटकात गेला तेव्हां.. इथे काय उपयोग त्याचा? चातुर्मासात पूर्वी अण्णा जायचे पंचक्रोशीत प्रवचनांसाठी तेव्हां श्रावणात रत्नांग्रिसनं ह.भ.प.वेद्यबुवा यायचे किर्तनाला... तेव्हां खालच्या वाडीतल्या बाल्यांचा म्रुदुंग आणून शंकर म्हणे बुवांना साथ करायचा.. भात लावणी झाल्यावर मोकळेच असलेल्या.बाल्यांच्या मंडळाला गोकुळाष्टमीला बाजूच्या गांवातनं कुठे सुपारी असली तरी त्यांच्या बरोबरही जायचा वाजवायला.. तेव्हां त्यांचं ऐकून हात मारून यायचा.. भारीच नादिष्ट होता..

अच्युतदादा नि तो, दोघंही तेव्हां थोडे लहान असतील.. आपल्याला तरी कुठे काय कळत होतं तेव्हां.. आता मात्र वाटतं केव्हां केव्हां;तल्लीन होऊन पखवाज वाजवणाऱ्या त्या शंकरच्या मागेपुढे राहून ऐकत रहावंसं..!'

विचारांच्या तंद्रीतच तिने अण्णांना पाय धुवायला पाणी दिलं नि स्वत: मग तोंड धुवायला बावीजवळ गेली.. एवढ्यात तिचा दादाही आला, हनुवटीवर ओठांखाली थोडीशी दाढी वाढवलेला.. हे कायतरी नवीनाच खूळ दिसत होतं ह्यावेळी! ती बघतच राह्यली.. ती कांही विचारणार तर अण्णांनीच विचारलं,

'काय रे., आलास कधी नि थेट देवळात गेलास कि काय?'

त्याची चाहूल ऐकून काकीही मागोमाग आल्याच..

'आणि पखवाज न्यायला आलावतास तर हांक द्यायची ना.'

त्यांच्या डोक्यात अजून तेच होतं..

'अरे हां. पडवीचं दार तर बंद होतं. मग तू पखवाज नेलास कसा? नि तुझी बेग आत?'

'अण्णा, अहो रेज्यातनं बेग आत झोपाळ्याअर टाकायला अशी काय अक्कल लागत्ये.. आणि

पखवाज म्हणाल तर तो शंकर काल संध्याकाळी गाभाऱ्यामागच्या खुंटीला अडकवून गेलावता.

तोच तर वाजवत होता माझ्याआधी येऊन नेहमीसारखा.त्याला मामाने सांगितलेलं ना. आता उलट त्यालाच दम भरतोय तो बाबी..

'म्हंजे तू वाजवत नव्हतास? ' वच्छीचा प्रश्न..

'मला कुठे येतंय त्याच्यासारखं.. मी मग हलकी गत वाजवत होतो थोडावेळ नि त्यातच त्याने तिथली दिवटी घेऊन देवीला काकडा ओवाळून घेतलासुद्धा! तुम्ही मग आता एकदम पुजेलाच जा अण्णा.. '

'आणि तू पाय न धुताच गेलावतास कि काय गाभाऱ्यापोतर?

'नाय हो.मी सभामंडपातच होतो.. तसं बावीवर पाणी घेतलंवतं पायांवर.. '

पाय धुता धुता त्याने सगळं सांगितल्यावर दोघा म्हाता-यांचा गोंधळ कमी झाला; तरी..

वच्छी मात्र स्वत:शी विचार करत, रेंगाळत तोंड धुवत राह्यली...

'आपला अंदाज खरा होता तर.. असा दणदणीत वाजवणारा दुसरा कोण असणार अजून.!

काकडा घेऊन जायचं निमित्त चुकलंच.आणि अण्णा पूजेला जातील तंवर तो निघून जाईल..

त्याची सकाळची पाळी वाजवून झाली.. आता बाबीच दुपारी येईल.. कदाचित दादा आहे म्हणून

संध्याकाळच्या आरतीला येईल शंकर., मग जातील दोघं कोंडात सिग्रेटी ओढायला.. शंकरपेक्षा दादाच जास्त.. तो सिग्रेटी ओढतो. हे भाऊंनी सांगितलं असेल का अण्णाना? कोणास ठाऊक.

पुढच्या वर्षी नोकरीला लागला कि जाईलच ना मुंबेला.मागच्या खेपेला तसं कांहीसं अण्णांजवळ बोलत होता.बीएस्सी होतोय हेच खूप.. पुढे शिकवणं अण्णांना झेपणारं नाही नि भाऊंचे उपकार तरी किती घ्यायचे.आत्तेसुद्धा आडवळणांने सुचवत असते कि 'आता वच्छीच्या लग्नाची तयारी करा अण्णा.' अण्णा बिचारे कान पाडून ऐकून घेतात..

'वच्छीचं लग्न! गांवाकड्च्या लोकांना विशीची मुलगी म्हणजे लग्नाच्या वयाची.शिक्षण बेताचं असेल तर.तिला काय कळतंय. म्हणायला सगळे तयार.टिपणं टाकून मोकळे.आलं स्थळ तर उजवून टाकायची.. त्यात आणि जात-पोटभेद गोत्रबित्र हे सगळं आलंच.. पण हे सगळं मुलांना

का नाही? दादा आता मुंबेला गेला नोकरीला तर काय करील कोण जाणे.. शांतुली बिचारी उगाच त्याच्या येण्याकडे डोळे लावून बसत्ये.. आणि.. आणि आपण?.आपण नाही का शंकरच्या येण्याची वाट बघत.. पण.. पण शेवटी अण्णाच सगळं ठरवणार.. मनाचं बंड शरिराला नाही झेपणार.. मग काय शंकरला लांबून नुसतं बघत रहायचं? तेच नियतीच्या मनात असेल तर! ''

डोक्यातलं चक्र चालूच राह्यलं..

'गो ध्यान कुठेय तुझं? न्हाणीत विस्तव घालायचा नाय? ' माजघराच्या पायरीशी येत काकींनी तिला आवाज दिला तशी भानावर आली.

'घालतेय आता.' म्हणत ती रहाटाजवळ गेली.

रोजचं रहाटगाडगं सुरू झालं..

सावळ्या पण मजबूत बांध्याच्या नि किंचित करूण भाव असलेल्या शंकरच्या एका नजरेसाठी ती आसुसलेली असायची.. आपल्या हे उपयोगाचं नाही असं जाणवत असलं तरीही; चाफ़्याची फ़ुलं गोळा करायला नेमकी त्याची वेळ साधून जायची. बावीतल्या गार पाण्याची घागर डोक्यावर ओतून ओलेत्याने गाभाऱ्यात जायचा ते वच्छी बघत रहायची.त्याचं लक्षच नसायचं! किंवा तो तसं दाखवायचा तरी.. आईबापाविना कायम निपुत्रिक मामाच्या उपकाराखाली दबलेल्या त्याला काय वाटत असेल हे कधी मनातच आलं नाही तिच्या..

जेवतांना मग अण्णा अच्युतशी बोलत होते. वाढतांना वच्छीच्या कानांवर पडत होतं. नि काकी सुद्धा काहीबाही विचारत होत्याच..

'भाऊसाहेब काय म्हणताहेत? नि तुझा अभ्यास कसा चाललाय?'

'चाललाय.. ' तो अण्णांशी ह्या विषयावर बोलायला नाखूष असायचा.

'भाऊसाहेब बिझी असतात.ते प्लान्टवर आहेत ना.. त्यांच्याच कंपनीच्या हेड ऑफ़िसला ते पाठवणारेत मला पुढच्या वर्षी, आधी एप्रेंटिस म्हणून.. मग परमनन्ट होईन पुढे.. '

'छान.. तुझ्या नोकरीचं जमलं तर बरंच होईल. पुढे दोनेक वर्षात लग्नाचं बघता येईल.आता आधी वच्छीचं बघायला हवं,.म्हणूनच विचारलं तुला. अक्का किंवा भाऊसाहेब कांही बोलले का?'

'त्याला काय बोलणार.. समोरून चांगलं स्थळ आलं तर जमेल तसं.उरकायलाच हवं.' वाढता वाढता काकींचाही सूर लागला.त्यांनी सहेतुकपणे अण्णांकडे पाह्यलं.त्यांनी फ़क्त मान हलवली. हे दोघं कसले इशारे करताहेत ते वच्छीला कळेना.

'जमेल तसं म्हणजे? '

'म्हणजे पंचक्रोशितलंच स्थळ आलं तर बरं पडेल. शहरात जाऊन करायचं म्हणजे खर्चाचं काम. नाही झेपायचं आपल्याला.. ' अण्णांचा खुलासा..

पुढे विषय बदलला तरी वच्छीच्या लक्षात आलं कि आई नि अण्णा ह्यांच्या मनात कायतरी चालू आहे. फ़क्त दादालाच सांगावं असं. तिने फ़क्त आवंढा गिळला.. विषय तिथेच थांबला..

तिला वाटलं 'संध्याकाळी शंकरला भेटायचं दादाचं ठरलंच असेल तर, तो आल्यावर कळेलच.

सोमवारी सकाळी तो जाईल तोवर नक्की, का आपणच विचारावं..? पण काय विचारणार?मला शंकर आवडतो हेही म्हणायची चोरी.. निर्लज्ज म्हणतील सगळे' '..ती मग संध्याकाळची वाट बघत राह्यली.

संध्याकाळी शांतुली वळेसर घेऊन आली, पण वच्छीला हाक न मारता पांदीतनं पुढे आली नि दीपमाळेच्या ओट्यावर जाऊन बसली.. एकटीच.. थोडी खिन्न उदास वाटली.. संवयीप्रमाणे मग वच्छी येऊन बसली शेजारी.. दोघीनी फ़क्त एकमेकींकडे पाह्यलं नि अस्वस्थ, असल्यासारख्या जोरात पाय हलवायला लागल्या.. अचानक त्यांनी एकाच सुरात वाक्य उच्चारलं..

'मला तुला कायतरी सांगायचंय शांते.' '

'माकाओ तुका सांगुचा हा कायतरी, वच्छा.. '

शब्दात शब्द मिसळून गेले तरी दोघीना एकमेकींचा हेतू कळला.!

'तुजो भाव गेलो?'

'नाय, परवा सकाळी जाईल. का विचारलंस? तुझ्याकडे तर तो बघतही नाही.'

'आता दोगजणा जातीत कोंडात.. पाटात पाय सोडून सिग्रेटी वढित बसतीत.. '

'हे सांगायला कशाला हवं.? तो नेहमीचा शिरस्ता आहे त्यांचा.. '

'ता बगूनच मगे तो येतलो.. येवंक नाय ना अजून..?'

'कोण? शंकर?'

'नाय गो. तो येव्चो नाय आता.! बाबी येतलो तुज्या अण्णांच्याकडे. तेच्या आदी माका जावूक होया.'

'तो कशाला येईल? आला तरी धुपारतीची तयारी करून जाईल.. त्याची संध्याकाळची पाळी वाजवून झाली कि.'

'म्हुरत बगूक येतलो.तुज्या अण्णांकडे.. दिपवाळी नंतरचो.'

'कोणासाठी?'

'बाय माजे! तुका सगळा फ़ोडून सांगूक होया गे! माज्या लग्नाचो म्हुरत.'

'काय? तुझ्या लग्नाचा?'

'होय तर. लई टाईम वार्ता करी होतो माजे आवशीवांगडा. मिया आडून ऐकलंय.. '

'तुझ्या लग्नाची बोलणी? आणि बाबी गुरवाबरोबर? कोणासाठी?'

वच्छीचा जीव गोळा झाला. तिला अंदाज आला.

'होय गे माजे बाय! त्या शंकऱ्यासाटना!' ऐकून वच्छी एकदम सुन्न झाली.. शांतुलीच पुढे

बोलली.. 'माजे आवशिन सांगलंला तेका, का आमी देवळी. देवस्थानच्या तुकड्यावर जगतांव.

तो गुरव.. तेंचा काम वरचा.. तेका कसा चलात!'

वच्छिचं लक्ष नव्हतं; पण शब्द कानांवर पडलेच. कळलं ते एवढंच कि बाबीने आपल्या

भाचासाठी, शंकऱ्यासाठी शांतुलीला तिच्या आईकडे जाऊन मागणी घातलेली..

'तो काय बोल्लो नाय पण माजी ऑस माका सांगा होती का तेका घाडी म्हनतंत.. पण

तेच्या बापाशीकडना तो पण देवळीच.. कामतेकरणीचो नातू ना तो.. '

वच्छी बोलली कांहीच नाही.. पण विचार करायला लागली.. 'आई नि अण्णा कसल्या खाणाखुणा करत होते त्याचा उलगडा झाला.. आपल्याबद्दल त्यांना संशय होता बहुतेक.आणि दादा आला

कि शांतुलीचं देवळात घोटाळणं.. दोन्हीवर अण्णांनी छान उपाय शोधला.. बाबीला अण्णांनीच शेवंताकडे, शांतुलीच्या आवशीकडे

पाठवला असणार.. आता आपल्यासाठी ते भाऊसाहेबांनी कळवलेलं स्थळ बघायला मोकळे.. नकळत तिचे डोळे भरून आले..

'तुका काय सांगूचा होता ना? त्या शंकऱ्यावरनाच कि?'

शांतुली वाट पहात थांबली. पण वच्छीच्या तोंडून फ़क्त एक सुस्कारा बाहेर पडला.. ती शांतुलीकडे पाहून मंद हंसली नि तिचा हात हातात घेऊन उठलीच..

' अंधार पडेल.ते वळेसर आत ठेव जा. तो येईल आता आरतीसाठी!' आत गाभाऱ्याकडे

पहात ती खिन्न मनाने आपल्या घराच्या पडवीत गेली. अण्णा अजून आलेले दिसले नाहीत. तिच्याकडे पहात शांतुली गाभाऱ्याकडे.. वळली, वळेसर ठेवायला! नकळतच तिने देवीकडे पहात हात जोडले!

तिच्या लक्षात आलं कि आज दोघीनीही पाय हलवले नाहीत!

** **

इतक्या वर्षानंतर पुन्हा आजही दोघींनी पाय हलवलेच नाहीत.. फ़क्त हात एकमेकींच्या हातात ठेवून पिकल्या केसांच्या नि थकल्या देहाच्या दोघी निवांत बसलेल्या.; अधू डोळ्यांनी कायमच्या अंधाराची वाट पहात नि तो जुना काळ आठवीत..

सतत आजारी नवऱ्याचं करून शिणलेली; नंतर मागे आलेली वच्छी आताही तेच करतेय.;

आई गेल्यावर एकाकी झालेल्या दमेकरी अण्णांचं करत, भावाच्या मनीऑर्डरीची वाट पहात.!

देवस्थानच्या बदललेल्या नव्या दमाच्या पंच कमिटीने पुढचं घर ताब्यात घेऊन दुसरा तरूण पुजारी ठेवल्यावर घर सोडावं लागलं. त्या धक्क्याने आई गेली. आता मागच्या मांगराच्या एका खोलीत, गाईच्या गवाणीच्या बाजूला चूल पेटवून वच्छी अण्णांसाठी पेज करते नि बाहेरच्या पारावर पुढ्यात जुने ग्रंथ घेऊन अण्णा भ्रमात स्वत:शीच बोलत असतात; प्रवचन दिल्यासारखे..

आणि शंकऱ्याच्या संसारात फ़ारशी न रमलेली शांतुली म्हाताऱ्या बाबीचं घर संभाळून देवळातली तेलवात नि फ़ुलं वळेसर देऊन आईची परंपराही जपतेय! आधी आज्याकडून नि नंतर बापाकडून शिकलेला तिचा मुलगा निषाद आता फ़क्त संध्याकाळच्या धूपारतीलाच पखवाज वाजवून एक पाळी संभाळतोय..

शंकऱ्या आता देवळाकडे वळतच नाही.. मुका झाल्यागत त्याचा पखवाज आता वाजतच नाही!

** शेवग्याच्या शेंगा **

देवळाच्या आवारातल्या पुजाऱ्याच्या मुख्य घरामागच्या परसातला दोन खणी मांगर.. केंबळाच्या शाकारणीचा. त्याचं गिड्डुं अरुंद दार, त्याला एक पायरी नि तिला लागून भिंतीला सांवरून धरणारा मातीचाच ओटा.. लोडाला टेकल्यागत त्या ओट्यावर उजवं कोपर टेकवून खालच्या पायरीवर विसावलेली, उघड्या दाराआडच्या अंधाराला छेद देण्याएवढी नितळ गोरी वच्छा अंगावरच्या पदरानेच वारा घेत समोरच्या गडग्यातल्या शेवग्याकडेच बघत विचार करत बसलेली..

वामकुक्षी म्हणून दोनखणी मांगराच्या कोपऱ्यात आडे घ्यायला जाण्यापूर्वी झापांच्या, सारवलेल्या पडवीच्या पायरीवर बसण्याचा तिचा रोजचा शिरस्ता..

दूरवरच्या पवनचक्कीची हलकीशी पकपक आणि अण्णांनी अडखळत पण ठराविक ठेक्यात म्हटलेल्या तोंडातल्या स्तोत्राच्या समेवर पायाचा रेटा दिला कि होणारी उघड्या पडवीतल्या झोपाळ्याची संथ करकर, थांबून थांबून येणारी..

अण्णांनी झोका थांबवला.. कि कान देऊन झुळकेनी परसातल्या शेवग्याच्या फ़ांद्यांनी पानांशी केलेली हळूवार कुजबूज ऐकू यायचीच. तो शेवगा तिचा सखाच होता जणू.. तेव्हांही नि आताही.. परतून आल्यावर!

मात्र आता मांगरापाठी वाढलेल्या चिव्याच्या बेटातून वाऱ्याने घातलेल्या कर्कश्श शिट्ट्या त्या कुजबुजीवर ओरखडे काढत, तिच्या नशीबाने तिच्या आयुष्यावर काढलेल्या ओरखड्यांसारख्याच..

तशी कधीकाळी पुढच्या घरात असतांना अशीच स्वत:च्या मनाशी केलेली कुजबूज तिला ऐकू यायची, स्वसंवाद होऊन!

"तेव्हां घराला जाग असायची.. आईबाबा नि मधूनच रत्नांग्रिहून उगवणारा दादा.. अच्च्या म्हणजे अच्युत नि मग त्याच्या पाठोपाठ येणारा त्याचा तो गांवातला मित्र.. "

बाबी गुरवाचा भाचा शंकर; आवडायचा तो तिला.. पण पुढे? सगळंच विचित्र घडत गेलं, म्हणजे ते तसंच घडायचं होतं, जगरहाटी म्हणून.. अण्णांनी चाणाक्षपणे केलेली प्रश्नांची सोडवणूक..

“का असं घडलं असेल? नियती!”

तिचा स्वसंवाद सुरू असायचा..

आपलेच प्रश्न नि आपलीच उत्तरं..! कधीही न संपणारी सांखळी, संवादाची!

कामं अशी नव्हतीच फ़ारशी.. पुढच्या घरात देवळाच्या, पंचकमिटीने नव्याने ठेवलेल्या लंगड्या पुजाऱ्याची, अनंताची मोनी बायको सुरेखा.. केव्हांतरी देवीच्या नॆवेद्यातलं कायतरी देऊन जाई! एरवी जेवणाचं असं वच्छीला फ़ारसं कांही करायला लागत नसे.. दोन माणसांचं पेजपाणी म्हणजे अक्षरश: पेजच.. कितीसा वेळ लागतोय..

जिथे पूर्वी त्यांची गाय बांधली जायची त्या कोपऱ्यातल्या चुलीवर पेजेचं भगुणं ठेवलं कि झालं..

त्या चुली नि मांगराची जमिन सारवणं.. गडग्याच्या अलिकडे परसात काटक्या वेचून न्हाणीच्या खोपीजवळ आणून टाकणं.आणि जुन्या घराच्या परसातल्या विहिरीवरून पाणी भरणं.. ती मोनी सुरेखा बाहेर नसेल तेव्हां.. बस्स..

गव्हाणी काढली तरी वासराचा खुंटा अजून होताच तिथे..!

गाय असतांना आत्ता बसतेय त्या पेळेकडेला भिंतीवर शेणी लावण्याचं काम होतंच असे.. आता ना गाय राह्यली ना शेणी..

घरामागच्या न्हाणीच्या चुलीला सरपण होतं पण सुरेखा चूल पेटवत नसे.. न्हाणीची खोपी फ़क्त भांडी घासायला..

पोलिओवाला नवरा नि चाचरत बोलण्याचा प्रयत्न करणारी मोनी सुरेखा.. ह्यांची सोय लावण्यासाठी सरपंचानी वजन वापरून तिच्या अण्णांना बाजूला केलं.. वयाचं निमित्त करून..

लंगड्या अनंताला त्यानी घरात कायकाय सोयी करून दिलेल्या.. मागच्या पडवीतच बंद बाथरूम नि गीझरसारख्या.. आता तर म्हणे फ़्रीजसुद्धा येणारे.. सरपंचाच्या बायकोचा भाऊ म्हटल्यावर सोयी हव्यातच.. देवळाच्या जमिनीचं उत्पन्न होतंच.. वर उत्सवाची वर्गणी जमायचीच..

"म्हणून तर आजारपणाचं निमित्त करून अण्णांना काढून मेव्हण्याला आणला.. इंजिनिअर झालेला दादा तर कांही हे पुजारीपण करणार नव्हता.. पुढे तो बाहेरगांवीच हॅदराबाद का कुठे नोकरीला गेला तो गेलाच.. आणि अवेळी पांढरं कपाळ घेऊन मागे आलेल्या आपल्याला चुलीसाठी पायवाटेवरच्या रानशेणी नि मिळतील ती फ़ाटी गोळा करून आणावी लागताहेत.. नशीब काय काय करायला लावील"

स्वत:शीच बडबडत टेकलेल्याच पेळेवर भार देत ती उठली.. आगरातली फ़ाटी गोळा करायला..

"आता एकदाच तर चूल पेटायची! फ़ाटी नि शेणी लागताहेत तरी कितीशा.. "

मागच्या पांदीच्या गडग्यातल्या शेवग्यापर्यंत फ़ेरी मारण्याचा तिचा रोजचा शिरस्ता.. तो शेवगा ही तिची हद्द.. तोच तर होता तिचा सखा नि सगळ्या घटनांचा साक्षिदारही.. तिकडेच बघत चार पावलं फ़िरली..

"निषादला बोलवून शेंगा काढायला सांगायला हव्यात.. मोनी कांही फ़ारशा उत्साहाने येत नाही इथपर्यंत.'.. वर बघत स्वत:शीच..

म्हातारा झाल्यामुळे बाबी गुरव आणि माघारी आल्यापास्नं तिला आठवलं, तेव्हांपासून शंकऱ्यानेही शेवग्याला पाय लावला नाहीच.. फ़ार काय देवळाची झाडलोट सोडली तर तो पखवाज वाजवत बसायचा त्या मागच्या चाफ़्यापर्यंतही हल्ली तो फ़िरकत नसे..

जरा मोठा झालेला निषादच संध्याकाळच्या आरतीच्या वेळी पखवाजची पाळी वाजवायचा.. नि सांगितलं कि शेवग्याचा पाला किंवा शेंगा काढून द्यायचा.. थोड्या घरी न्यायचा..

शांतुलीला.. त्याच्या आयशीला आवडतात म्हणून..

तिचं स्वगत चालूच होतं पार्श्वभागी अण्णांच्या झोक्यांची कुरकूर.. नि त्यांना आलेली खोकल्याची उबळ.. ते डाव्या हाताने छाती दाबून खोकत राह्यले म्हणून मधेच आत जाऊन तिने त्यांना पाणी दिलं.. ते फ़ुलपात्रही त्यांच्या हातून पडलं.. त्यांना पुन्हा पाणी पाजतांना त्यांनी करूण नजरेनी तिच्याकडे पाह्यलं..

"काय होतंय अण्णा? छातीत दुखतंय का? विटेच्या तुकड्याने शेकून देउ का? बरं वाटेल..! "

कांही न बोलता डाव्या हाताने छाती दाबत ते तिचा हात धरून झोपाळ्यावरच आडवे झाले..

त्यांना उशी देऊन वच्छा परत बाहेर आली..

पंचकमिटीने सरपंचाच्या सांगण्यावरून अनंताला पुजारी नेमला नि तीसेक वर्ष सत्ता गाजवलेल्या अण्णांची अवस्था केविलवाण्या आश्रितासारखी झाली. वय झालेली आई धक्क्याने आजारी पडली. अण्णांचं मुख्य पुजाऱ्याचं काम आणि वेतन दोन्ही गेलं नि बेवारशासारखं कमिटीच्या दयेखातर दिलेल्या तुकड्यावर जगणं आलं..!

तेही जिथे राज्य केलं त्याच घराच्या परसदारी असलेल्या दोनखणी मांगरात.. देवळाचा कारभार दूरच राह्यला..

असं का व्हावं ह्याचा विचार सोडून द्यावा म्हटलं तरी येतच राही..

आता वयामुळे आणि आईच्या जाण्याने एकट्या पडलेल्या अण्णांची देखभाल करायला मागे आलेली वच्छा, गांवात परतलेली!

भावणीची शांतुली तिची शाळेतली मैत्रिण, गडग्यावरून उड्या मारत पाठीमागच्याच शाळेत

जाणाऱ्या त्या दोघी मैत्रिणी तशा कधीकाळी दिपमाळेच्या ओट्यावर बसून पाय हलवणाऱ्या; आता उतारवयात एकत्र आल्या असल्या तरी दोघींची परिस्थिती वेगवेगळी होती.. ती तशीच असणार हे जणू नियती इतकंच अण्णांनाही पूर्वीच उमगलं होतं बहुतेक..

वरून पडलेली माडाची झावळी ओढत न्हाणीच्या चुलीजवळ टाकायला गेली तो मागचं दार उघडून अनंता बाहेर आला. पाठोपाठ मोनी सुरेखाही..

"अक्का, मी सरपंच साहेबांच्या बंगल्यावर जातोय.. मीटिंग आहे, चैत्री नवरात्राच्या उत्सवाची.. '

तिने नुसतं प्रश्नार्थक नजरेने पाह्यलं..

'लक्ष ठेव घराकडे.. आणि देवळात कोणी आलं तर.. सुरेखाला ऐकूही कमी येतं. तुला घंटेचा आवाज येईलच ना.. "

" तुम्हीच पुढच्या दाराला आतून अडणा घालून जावा, मागच्या दाराने वळसा घालून बाहेर पडा.. मात्र पडवीतला पखवाज तिकड सभामंडपात नेऊन ठेवा.. तुम्हाला उशीर झालाच तर निषाद येईल तेव्हां असलेला बरा.. गाभाऱ्याला कुलूपच असेल ना.. दिव्यातली तेल वात बघून जा.. "

'ते सगळं झालं बघून.. उशीर झालाच तर.. '

'निषाद येईलच ना अभ्यासाला, त्याला थांबवून घेते.. शेंगा काढून घेते दहाबारा.. शांतुलीसाठीही. चालेल ना?'

' हे काय नवीन? नेहमीच तर काढतो कि निषाद.. "

".. वहिनीला विचारा हव्यात का?'

मोनीला शेंगा समजल्या, मानेनेच नको म्हणाली.

'तिन्हीसांजेपोतर येतोच आहे मी.. पण लागलीच तर निषादला हिच्याकडून चावी घेऊन गाभारा उघडायला सांग आरतीसाठी.. शंकऱ्या तिकडेच येणारे.. उत्सवाची कामं वाटून देणारेत ना.. '

तिने मान डोलावली.. तो घरात जायला वळला तो तिने मागे वळून विचारलं..

'आरतीच्या तयारीचं काय?'

'मी तयारी करून जातोय सगळी. हिला पडवीच्या रेज्यातनं गाभाऱ्याची चावी देतोय.. निषादला नाहीतर त्याच्या आयशीला लागेल ना.. "

"ती येईलच गजरे घेऊन.. "

तो आत गेला, नि वच्छाही एकदा झोपाळ्यावर डोकावून पुन्हा आपल्या त्या मातीच्या सिंहासनावर बसली, विचारांशी चाळे करत..!

ते कुठले थांबायला! ते येतच राह्यले आठवणी घेऊन..

रत्नांग्रित आत्तेकडे कॉलेज शिक्षणासाठी राह्यलेला तिचा दादा अच्युत अगदी ठरल्या कि ठरवल्याप्रमाणे नोकरीचं निमित्त करून मुंबेस गेला नि तिथून कंपनीच्या करारानुसार कुठे बंगलोर कि हैदराबादला!. म्हंजे त्याचं तसंच ठरलेलं असावं असं भाऊसाहेब अण्णांना म्हणाले होते.. भाऊसाहेब म्हंजे आत्तेचा नवरा.. त्यांची कोण भाची होती तिच्यासाठी त्यांनी म्हणे अच्युतला मनाशी ठरवूनच कॉलेज शिक्षणासाठी आपल्याकडे ठेवून घेतलेलं..

आणि वच्छाला तिच्या अधू प्रकृतिच्या भावासाठी सांगून साटंलोटं करायचं होतं म्हणे त्यांना!

अच्युतने तिकडच्याच मुलीशी लग्न केल्याचं कळलं तेव्हां स्वत: भाऊसाहेबांनीच हे अण्णाना सांगितलं..

फ़ारसं शिक्षण न झालेली भाऊसाहेबांची भाची तशीच राह्यली, अच्युतची वाट बघत.. पुढे तिच्या भावाशी ठरल्याप्रमाणे वच्छाचं लग्न झालंच..! भाऊसाहेबांनी अच्युतच्या शिक्षणासाठी मदत केली त्या मिंधेपणापोटी अण्णा कांही बोलू शकत नव्हते..

तरीही भाउसाहेबांचे नि प्रसंगी आत्त्याचे टोमणे ऐकावे लागलेच.. मानपानावरून..

अच्युतने पाठ फ़िरवली त्यामुळे मानपान करायला पॅसे कुठनं आणणार पुजारी माणूस..

तो दमेकरी सतत आजारी नवरा पुढे डायबेटिस का कायसं होऊन लवकर गेलाच! अवघी पांच वर्ष संसार करून वच्छा परत आली!..

पांढरं कपाळ घेऊन लेक परतली. ह्याचाच बहुतेक आईला धक्का होता..

आणि अण्णाही भ्रमिष्ट झाले.. बाहेर चाफ़्याखाली कसली तरी पोथी घेऊन एकटेच प्रवचन करायला लागले.. तेही असंबद्ध.. मग वच्छा त्यांना आत आणून पडवीतल्या झोपाळ्यावर बसवी..

रजेचं निमित्त सांगून अच्युत आलाच नाही.. आईच्या कार्याला पॅसे मात्र पाठवलेन..

त्याच्यामुळे आत्त्या नि भाऊसाहेब तसे दुरावलेलेच.. वच्छालाच सगळ सांवरावं लागलं.. आपलं नशीब म्हणून.. तेही अण्णानीच घडवलेलं!

ती गुरवाचा भाचा शंकरच्या पुढे पुढे करायची ते लक्षात आलं म्हणूनच तर अण्णांनी बाबी गुरवामार्फ़त शंकरला शेवंता भावणीची पोर शांतुली सांगून पाठवली.. शंकरही होता भावणीच्याच कुळातला,

चंपा कामतेकरणीचा नातू.. बाबी गुरवाची बहिण, शंकरची आई सुलक्षणा सदा कामतेकराबरोबर पळून गेलेली..

ती गरोदरपणी कावीळ पोटी पडून पुढे गेलीच तेव्हां कामतेकरणीने कानांवर हात ठेवले नि पोरका शंकर मामाकडे, बाबी गुरवाकडे आला.. मामी होती तोवर करत होती..

पांदीपलिकडच्या शाळेत गडग्यावरनं उड्या मारून अच्युतबरोबरच जात होता.. पोरका म्हणून काकींची माया लागली नि छान मैत्री जमली दोघांची!

पखवाज ह्या एकाच समान धाग्याने.. बांधले गेले दोघं.. सभामंडपात अभ्यास कमी नि पखवाज बडवणंच जास्त.. म्हणून अण्णांनी पखवाज पडवीतल्या खुंटीला टांगला.. त्यांचा हात पोहोचू नये म्हणून..

इंग्रजी शाळेसाठी नि पुढे कॉलेजसाठी अच्युत लांब गेला.. शंकर मात्र फ़ारसं शिक्षण न झाल्यामुळे न बोलता मामाची देवळातली काम करत राह्यला.. तसा ठीक होता पण बरोबरच वावरल्यामुळे वच्छाचं बावचळल्यासारखं वागणं ठीक नव्हतं..

जातीपातीच्या काळजीपोटी अण्णांनी गुरवाच्या मध्यस्थीने शंकऱ्याला बाजूला केला, शांतुलीशी लग्न लावून देऊन..

नव्या तरूण पुजाऱ्याने, अनंताने काकडारतीची प्रथा पंचाना सांगून बंदच केलेली.. तो एकटाच पहाटेस एक निरांजन ओवाळून यायला लागला.. संध्याकाळी मात्र निषाद.. शांतुलीचा मुलगा येऊन छान वाजवायचा, बापापेक्षाही सरस.. शंकरने त्याला शिकवलेलं..

पण ते देवळाच्या सभामंडपात म्हणजे पुढच्या दारी.. त्यासाठी पूर्वी रहात असलेल्या घराला वळसा घालून जावं लागे, ते नकोच वाटे मग.. कधीकाळी इथे मुक्त वावर होता नि आता?

तो अनंता.. अप्पा मोकाशींचा मेव्हणा इथला सर्वेसर्वा झालेला.. त्याची बायको सुरेखा.. स्वभावाने बरी असावी, पण फ़ारसं बोलू शकत नव्हती.. चाचरत प्रयत्न करायची म्हणून मोनी म्हणायचे सारे..

सणाला नैवेद्याचं पक्वान्न मात्र न चुकता द्यायची.. वच्छाला ते खाऊ नये असं वाटलं तरी घ्यावं लागायचं.. शांतुली मात्र घरी नेते.. निषादसाठी!

तिची आई म्हणायची तसं, "आपण देवळी माणसं, लोकांच्या दानधर्मावर जगणारी.. "

तिच्या आईने भावणीची ती वृत्ती संभाळली तरी मुलीचं लग्न करून दिलेलं, शंकरशी..

तसा तिचा खरं तर दुहेरी मान होता..

देवळाकडचं उत्पन्न म्हणजे भात, जे तिची आई गेल्यामुळे आता बंद होणार होतं.. आणि गुरवाची घरकारिण..!

शांतुलीने लग्न करून आईचा भावीणीचा वारसा सोडला असला तरी वसा टाकला नव्हता.. अजूनही ती दोन्ही वेळ देवीचे वळेसर नि पुजेची फ़ुलं आणून देतच असे..

अनंता देवीला फ़ारशी घालत नसला तरी शांतुली म्हणे तशी "भटीणबाय," त्याची बायको वळेसर माळते..

आता गेला महिनाभर.. शिकणारा निषाद भाविणीच्या जुनाट घरात अभ्यासाला जातो नि आजीच्या घराची झाडलोट करतो..

शांतुली कधी संध्याकाळच्या धुपारतीला वळेसर द्यायला यायची तेव्हां मागच्या दारच्या पांदीतला गडगा ओलांडून आत यायची.. मुद्दाम वच्छाला भेटायसाठी..

संध्याकाळची पखवाजची पाळी वाजवून झाल्यावर अनंताने निषादसाठी दिलेलं देवापुढचं एखादं फ़ळ ती वच्छाला देऊ करायची

ती नको नको म्हणत असतांना.. वच्छा मग तिच्या हाती दुपारी भटणीने दिलेला प्रसादाचा द्रोण द्यायची..

सकाळी निषाद किंवा क्वचित शंकर देवळाच्या बावीवर लखलखीत केलेली तांब्याची घागर भरून द्यायला यायचे नि हार फ़ुलं देऊन जायचे..

संध्याकाळी मात्र शांतुली मुद्दाम यायचीच, वच्छाला भेटायला..

तिची आई दिडदोन महिन्यापूर्वी गेली तेव्हांपास्नं तिचं येणं कमी झालेलं.. तिला मिळणारं भावणीचं वर्षासन, आता बंद होणार होतं.. भावणीची प्रथाच बंद झाली.

दोघींच्या गप्पात आता हाच विषय नाहीतर अण्णांच्या तब्येतीची विचारपूस एवढंच राह्यलं होतं..

गुरवाचं काम नि देवस्थानच्या जमिनीतून मिळणारं त्याच्या वाट्याचं भात मात्र शंकरला मिळायचं.. म्हणूनच तो किंवा निषाद उत्सवात आपलं काम करीत..

पुजारी म्हणून अण्णांचं वर्षासन बंद झालं् तरी अण्णांना देवस्थानच्या पंचकमिटीच्या मेहेरबानीवर मांगरात आसरा मिळाला हेच चिकार होतं.. एरवी मिळायचं कांहीच नाही, उलट वच्छाला भावाच्या मनिऑर्डरची वाट बघावी लागायची..

कधीमधी शांतुली तांदूळ आणून द्यायची!..

हे सर्व झालं तरी आईची प्रथा शांतुलीने चालू ठेवली होती.. देवीला वळेसर नि हार घेऊन यायचीच, न चुकता.. मुद्दाम वच्छाला भेटायला यायचं निमित्त..

का कोण जाणे तिच्या मनाला एक बोचणी राहूनच गेलेली.. वच्छा ज्याच्यावर जीव टाकत होती त्याच्याशीच आपलं लग्न लावून दिलं आयशीने..!

तिला अचानक कुकारा ऐकू आला तशी तिने चमकून पादीकडे बघितलं.. तिला माहित होतं हा कुकारा म्हणजे शांतुलीचा इशारा.. तिने पांदीच्या गडग्यातल्या शेवग्या आड नजर टाकली.. शांतुली तिला इशारा करत होती.. ही अशी भर दुपारची कुठून आली..

तिने लहानपणच्या संवयीनुसार तिला कुकारा घालून प्रतिसाद तर दिला.. पण अण्णांनी ऐकल असेल तर म्हणून चपापली..

वच्छाने आधी मागे पडवीतल्या झोपाळ्याकडे पाह्यलं.. आडवे झालेले अण्णा संथ लयीत कायतरी गुणगुणत असावेत असं वाटलं.

'आत्ता छाती धरून खोकत होते नि आता काय गुणगुणताहेत कोण जाणे.. त्यांनाही भूतकाळातली भुतं दिसत असावीत का? का आपल्या दुर्दैवाचा विचार करत असतील?..

अलिकडे शांतुली आली कि हाताने तिच्याशी बोलू नको अशा खुणा का करतात कोण जाणे.. न बोलता मान हलवत रहातात, मुक्याचं व्रत घेतल्यागत.. '

तिला आठवलं, सुतकात असतांना आईचे दिवस होईपर्यंत ती नि गुरवाचं कोणी फ़िरकलं नव्हत निषाद सोडून! बाबी म्हातारा जाग्यावरच होता.. शेंगा काढतांना शेवग्यावरनं पडल्यापास्नं लंगडणारा बाबी अण्णांना भेटायला येऊन गेला.. त्याच्याशी अण्णा कांही बोललेच नाहीत..!

आता मात्र वच्छा भावणीला शेवटचं बघायला गेली नि आल्यावर अवेळी अंघोळ केली म्हणून तिच्याकडे एकटक बघत राह्यलेले, जणू नजरेने कांही विचारत होते..!

तिने जेव्हां भावणीचं सांगितलं तेव्हां तर थंड नजरेने एकवार बघून मान हलवत राह्यले.. बस्स.. हीच त्यांची प्रतिक्रिया.! एरवी उत्सवात पुढेपुढे करणाऱ्या शेवंताशी हंसून बोलणारे अण्णा एकदम गोठल्या नजरेने बघत राह्यले..

शंकरला पंचानी मदत केली थोडीफ़ार..!

दहा दिवस आरतीच्या वेळचा गाभाऱ्यातला पखवाजही मुका झाला होता.. देवीलाही दु:ख झालंच असेल कि ; नथ घालून शेला पाघरलेली, पालखीवर चॊऱ्या ढाळणारी तिची पाठराखीण असलेली शेवंता गेली म्हणून..!

तिला उगाच वाटून गेलं,

"तेव्हांचा भावणीचा थाट बघून नाकं मोडणारी आई असायला हवी होती! असो. आत्ताचा शांतुलीचा कुकारा नि आपला प्रतिसाद त्यांनी ऐकला नसला म्हणजे मिळवली.. उगाच मान हलवत राह्यचे पुन:पुन्हा.. ".

मांगरापलिकडे नव्यानेच विस्तारलेल्या चिव्याच्या बेटातून वाजणाऱ्या शिट्ट्यांच्या आवाजामुळे अण्णांना बहुतेक कांही ऐकू गेलं नसावं..

शांतुलीला हाताने थांब अशी खूण करून ती मग लगबगीने गडग्याजवळ गेली..

'आत येत्येस का? '

'नुको गे बाय माझे.. तां मगे फ़ुडे जावन देवळाच्या गडग्यातसून वाट हा थंय जाऊचा पडतला.. आनि भटाच्या घरासमोरून इलंय तं तुजी नवी भटीण करवादतली.. ह्या टायमाक भट झोपलो आस्तलो ना.. हानि भटिण कान लावन आस्ता आपल्या बोलण्याकडेन.. '

'नाय, तो गेलाय सरपंचाच्या बंगल्यावर चैत्री उत्सवाच्या मीटिंगला.. सांगून गेलाय.. '

'बाय माझ्ये, मगे माझो घोव पण गेलो आस्तलो.. '

'जाणारॅ म्हणाला.. इथे किती वेळ उभ्याने बोलत -हाणार? संध्याकाळी गजरे द्यायला येशील ना तेव्हां ये मग सरळ पुढचा आखाडा ओलांडून.. नेहमीच्या जागी '

'म्हंजे आपल्या दीपमाळेच्या ओट्यावर!"

'हो.. आणि निषादला लॊकर पाठव जरा.. अनंता सांगून गेलाय. आरतीच्या वेळी भटीण चावी देईल.. तू मात्र नेहमीसारखीच ये.. "

'मी नाय येत आता! निषाद येता ना सांजची पखवाजची पाळी वाजवूक. आणि भटिणओ आस्तली पडव्येत तिच्या.. आपणाक बोलूक नाय गावचा.. '

' तिला कुठे ऎकू येतंय नि तुझा झील आतमधे जाईल.. आणि काय एवढं बोलायचं आस्तंय आता.. "

' गो, माजे आवशिक जावन आता दोन म्हॅने होतले.. मरुच्या आदुगर तिणा कायतरी सांगल्यान ता सांगूचा होता..!'

'सांग कि मग.'

'हंय नुको गे बाय.. तुजे अण्णा झोपले हत कि?'

'त्यांचं काय नाय.. नुसते बघत बसतात.. तू आलीस कि मान का हलवतात ते कळत नाय.. '

'ताच तर..!'

' तुझ्या घोवाला सांग उद्या शेंगा काढायला.. नायतं निषाद येईल त्याला सांग.. तुझा घोव यायचा बंदच झालाय ना? मी इथे आहे म्हणून असेल.. "

' तेचा आता काय ऱ्हवला हा? माजा लग्न तेच्या वांगडा ठरवून तुज्या अन्नांनी एका दगडात दोन कि कितीतरी पक्षी मारल्यानी.. आपुन दोगजनी खुळ्या नाय तं काय.. तुजो भाव माज्याहारी नि माजो घोव तुज्याहारी बगत देखित नाय होते.. अण्णांनी सगळा कसा रितसर केल्यानी ना.. "

' ते मरो.. जुनं झालं ते.. पण आत्ता एवढ्या उन्हाची कुठे चाललीस?'

'घराकडे.. आनि खंय? '

'अगो पण आलीस कुठून मग?'

'भारी बाय पंचाती तुका.. अगो आवशीचा घर सारवून इलंय. म्हयनो होवन गेलो तिका जावन.. भिक्याभटान काय तां म्हयन्याचाओ श्राद्ध.करून घेतल्यान.. '

'महिना झालासुद्धा भावणीला जाऊन..?"

' अगो पंद्रा दिस वरच झाले.. तांच तं सांगुचा होता.. आता नि्षाद जावन बसतलो ना थंय अब्ब्यास करूक!'

'तुज्या घराकडे जागा कमी आहे का?

'नाय गो, बाबी म्हातारो खोकत ऱ्हवता ना. नि मगे माजो घोव करवादता.निषाद जेवूक घराकडेन येता नि देवळात येवन बसता थोडॊ टायम.. मंडपात अब्ब्यास करूक थंड आस्ता ना.. भट काय बोलूक नाय अजून.. '

'तो कशाला बोलेल? आपण दोघीसुद्धा बसायचो नाय का अभ्यासाला.. '

' होय तं.. पन त्या टायमाक तुजे अन्ना पुजारी होते..!"

" पंच कमिटीने म्हातारपणामुळे अण्णांच्या जागी त्याला आणलाय नि आम्हाला घर खाली करायला लावलं.फ़क्त बाहेर काढलं नाय अजून हीच मेहेरबानी.. '

'अगो, सरपंचाचॊ म्हेवनो आसा ना तो.. आपल्या टायमाक काय मज्जा वाटायची.. "

'शंकऱ्या कानावर चाफ़्याचं फ़ूल अडकवून मान खाली घालून काय छान पखवाज वाजवायचा मंडपात.. आपण दोघी दिपमाळेच्या ओट्यावर कितीवेळ पाय हलवून ठेका धरायचॊ."

"हानि तू टक लावन तेच्याहारी बगी व्हतंस ता तुज्या आ्वशीच्ये ध्यानात इला आस्तला.. '

"आणि तू माझ्या भावाकडे! तेही तिच्या लक्षात आलं असणार.. "

' होय तं! म्हणान तं तुजी आऊस करवादायची ना पडव्येत दंगो करा नुको म्हणान.. '

'अगं, तुझ्या लक्षात आहे अजून? हे तर दादा म्हणायचा.. पण बघायचा मात्र नाही तुझ्याकडे.. '

' तो कशाक बगतलो.. रत्नांग्रिक कालिज शिकनारो.. मी ह्या असला अडानी.. म्हणान तं..! '

' म्हणून काय?'

'तुज्ये अन्नानी माज्या आवशिक सांगून माका हंय दिल्यानी. आमी देवळी ना.. हानि तुजी पंचात केल्यानी.. '

'ती होणारच होती. शंकऱ्या मला आवडायचा हे त्यांच्या लक्षात आलं म्हणून त्यांनी एका दगडात दोन पक्षी मारलेनी.. ;

'भटाचा चेडू पळून बिळून गेला तं?.. शंकऱ्या धड गुरवाचोपण नाय.. अर्दो देवळीच.. कामतेकरणीचो नातू ना.. अण्णा धोरणी खरेच.."

'चल, बघते घरात जाऊन.. अण्णांना चहाची तलफ़ आली कि खोकत रहातात.. '

'जागे हत?'

'होते मघाशी, कायतरी म्हणत.. मग आडवे झाले.. मी झोपवून आल्ये.. '

'जा बाए.. तेंका जप.. मिया घराकडेन जावन येतंय आमच्या म्हाताऱ्याक चाय देवन.. '

ती वळून गेली.. नि वच्छाला कसलातरी आवाज एकल्यासारखं वाटलं.. ती लगबगीने घराकडे वळली.. नि पडवीच्या दारातच थबकली..!

काय करावं हे न सुचून क्षणभर सुन्न होवून बघत राह्यली, अण्णा झोपाळ्यावरनं खाली पडले होते, वांकडे तिकडे, पण एक हात छातीवर दाबून..!

'ह्यांना काय मिरगी आली कि काय?'

जवळ जात त्यांना धरून बसतं केलं तेव्हां तिच्या हाताला त्यांचं शरिर ओलं लागलं इतके ते घामेजलेले.. तसंच त्यांना आडवं केलं तेव्हां तिच्या लक्षात आलं त्यांची पांघरायची घोंगडीच खाली होती.. तिला चटका बसल्यासारखं झालं..

"आपण अण्णांना घोंगडीवर काढलं.. हा अशुभ योगायोग खरंच काय? '..

तिने त्यांच्या शरिरावरनं् हात फ़िरवला.. ते थंड पडलेलं..

ती समजायचं ते समजली..! ते गेलेलेच होते..!!

सुन्न होवून जरावेळ तशीच बसून राह्यली.. तिला पुढचं सगळं चित्र दिसायला लागलं.. आता आपलं काय होईल हे!

ती मोनीला हाक मारायला आली तो निषादच गडग्याच्या बाजूने येतांना दिसला, हातात शेंगा घेऊन. त्याला हांक मारतांना तिचा आवाज चिरकला नि तिने तिथेच बसकण मारली..

हातातल्या शेंगा टाकून निषाद धावला..!

**

त्याने धावाधाव करून बापाला नि अनंताला असं करत माणसं जमवली..

**

सगळं क्रियाकर्म पार पडल्यावर रात्री उशिरा भटणीने भात करून आणला तेव्हां वच्छाला न्हायला घालून शांतुली जायला निघणार होती.. वच्छा तिचा हात सोडत नव्हती..

'बाय माजे, माकाओ डोईवरसून पाणी घेवचा पडतला ना.. मियांओ तुज्यासारक्याच पोरक्या झालंय गो.. आवशिक म्हयनो झालो तं आता.. ह्या झाला.. '

वच्छाने चमकून तिच्याकडे बघितलं..

'तांच सांगूचा होता तुका केव्हाधरना.. मरन्याच्या अगोदर आवशिन देवीची आण घेवन सांगल्यान हा माका. आवशीच्या तरणेपणात अण्णांचा जाणायेणा होता तिच्याहारी.. मी तुजी भॅणच गो.. त्यासाटनाच अण्णांनी गुरवाक मागणी घालूक पाटवल्यानी.. तुजो

भाव तो माजो भावच ना.. माजा ठीक झाला.. पण तुजा मात्र मातेरा केल्यांनी.. "

एका दमात ती हे सर्व बोलली नि हुंदके द्यायला लागली!

वच्छा सुन्न होऊन तिने शांतुलीला घट्ट मिठी मारली.. तो दारात शंकऱ्या.. अस्थि पडवीबाहेर ठेवायसाठी आलेला.. त्याने ऐकलं होतं सगळं..

दोघीनी पाह्यलं.. शांतुलीच पुढे म्हणाली..

"ह्याना केल्यान सगळां.. देवळी कि गुरव.. पण आसा तेंचो जावईच ना.. '

'माझं काय होईल आता? सासरी कोण नाय नि दादा काय येणार नाय..!'

असं ती म्हणतेय तो, निषाद हातात दुपारी काढलेल्या शेंगा घेऊन उभा..

'काळजी करा नुको.. माज्या आवशिचा घर आसाना? आणि हो माजो झील तुजोच समज.. तुका काय कमी पडूचा नाय.. '

शांतुली वच्छाला गोंजारत राह्यली नि निषाद बघतच राह्यला!

'आजच्या रात्री ह्या घरात दिवो आसा.. तू ऱ्हवतंस तं ऱ्हव हंयसरच.. उद्या तेका घेवन जावया घराकडेन.. निषाद, त्या शेंगा घराकडेन घेवन जा.. हंय काय चूल पेटवूची नाय धा दिवस.. "

वच्छाने चमकून बघितलं..

कधी न बोलणारा शंकर पहिल्यांदाच एवढं सलग बोलला.. तिला धन्यधन्य वाटलं..!!

****

विजय खाडिलकर

यांची इतर पाच पुस्तके.